मानवी जीवनाची अंतिम आणि अपरिहार्य अवस्था म्हणून वृध्दावस्थेकडे पाहिले जाते. या अंतिम आणि अपरिहार्य अवस्थेपर्यंत पोहचण्यापूर्वी बाल्यवस्था, तारूण्यवस्था आणि प्रौढावस्था अशी वाटचाल करत करत वृध्दावस्था प्राप्त होते. पारंपारिक भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करता मानवी जीवनाची वाटचाल ही ब्रम्हाचार्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या चार आश्रमाच्या द्वारे होते. मनुष्याचे आयुष्य शंभर (१००) वर्षाचे आहे अशी कल्पना करून प्रत्येक आश्रमात २५ वर्षे मनुष्य आयुष्य व्यतीत करतो अशी कल्पना करून वयाची आणि आश्रम व्यवस्थेची सांगड घालण्याचा प्रयत्न भारतीय तत्त्वज्ञान केला गेला असल्याचे आढळते. त्यानुसार वयाची ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर मनुष्याने सर्व प्रकारच्या संसारिक व्यवहारिक जीवनातून निवृत्त होऊन वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करावा असे म्हटले आहे यादृष्टीने विचार करता भारतीय तत्त्वज्ञानानुसार ५० वर्षे वयापेक्षा जास्त वयातील व्यक्तीचा समावेश वृध्द व्यक्तीत केलेला होता असे दिसते असे असले तरी वेगवेगळ्या मानवंशामध्ये वृध्दत्वाची सुरूवात ही वेगवेगळी असू शकते. आनुवंशिकता आणि हवामान यावर ही वृध्दत्वाची सुरूवात अवलंबून असते. त्यामुळे विभिन्न देशामध्ये वृध्दापकाळाची वयोमर्यादा वेगवेगळी मानली आहे. शिवाय सामान्यपणे असेही म्हटले जाते की, A man is as old as he thinks परंतु हे ही फारसे योग्य नाही. पाश्चात्य राष्ट्रात गेल्या शतकापासून वृध्दांच्या समस्याबाबत अध्ययन करणारे एक स्वतंत्र शास्त्र विकसित झाले आहे. या शास्त्राला (Gerontology, Science of old age) म्हणुन ओळखले जाते. हे शास्त्र नवीन असले तरी वृध्दांच्या संदर्भात प्राचीन काळापासून विचार केला जात असल्याचे दाखले आढळतात.

शरीराच्या विविध घटकांची झीज झाली की, वार्धक्य येते असा विचार आयुर्वेदात मांडण्यात आला आहे. इ.स. पूर्व १६०० मध्ये घॅपिरसड मध्ये वृध्दांचे तरूणामध्ये रूपांतर करण्याचा उपचार सांगितला आहे. इ.स. पूर्व ५ व्या शतकात हिपोक्रेटिस याने वृध्दाची तुलना शिशीर ऋतुशी करून वृध्दांना होणाऱ्या मोतीबिंदू, संधिवात यासारख्या विकाराचे वर्णन केलेले आहे. प्राण्याच्या शरीरात एक प्रकारची उष्णता असते व वाढत्या वयाबरोबर ती कमी होत जाऊन वृध्दत्व व मृत्यू येतो असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे. रॉजर बेकन यांनी वृध्दांच्या आरोग्यावर १३ व्या शतकात पुस्तक लिहिले. वार्धक्यातील विकारावर १८४० मध्ये पहिला वैज्ञानिक ग्रंथ लिहिण्यात आला १९१२ मध्ये नेरचॉर यांनी न्यूयार्क मध्ये वार्धक्यातील विकारांचा अभ्यास करण्यासाठी संस्था स्थापन केली व Geriatrics या विषयावर ग्रंथ लिहिला. १९५० मध्ये वार्धक्य विज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आली. जी International Aging Federation या नावांने ओळखली जात असून विविध देशात वृध्दांकरीता कार्य करत असलेल्या अनेक राष्ट्रव्यापी संघटना या संघटनेशी आज सलग्न झालेल्या आहेत.

वृध्दांच्या समस्यांचा आणिं समस्यांवरील उपाययोजनाचा अभ्यास करत असताना वृध्द कोण आहेत हे जाणून घेणे गरजेचे ठरते. वृध्द कोणास म्हणावे या संदर्भात अनेक अभ्यासकांनी वृध्दांच्या व्याख्या केलेल्या आढळतात. त्यावरून एवढेच लक्षात येते की, व्यक्तीच्या जीवनातील शेवटचा काळ म्हणजे वृध्दावस्था किंवा वृध्दापकाळ होय. हे जरी लक्षात आले तरी वृध्दावस्था वयाच्या कोणत्या वर्षापासून सुरू होते. वृध्दत्वाची कोणती लक्षणे केंव्हा दिसून येतात यासारख्या प्रश्नाची उत्तरे प्राप्त होत नाहीत. म्हणूनच समाजशास्त्राचा अभ्यासक या नात्याने वृध्दवस्थेचा समाजशास्त्रीय अर्थ समजून घेण्यासाठी वय आणि सामाजिक संदर्भ या दोन घटकांवर चर्चा करणे आवश्यक वाटते.

**वय आणि वृध्दावस्था :**

सरासरी आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा, हवामान, शारीरिक आरोग्य महत्त्वपूर्ण कार्य करण्याची क्षमता यासारख्या बाबतीत प्रदेशपरत्वे स्थिती समान आढळत नाही. त्यामुळेच प्रत्येक देशात वृध्दावस्थेचा प्रारंभ वयाच्या कोणत्या वर्षी होतो याबाबत अभ्यासकामध्ये एकवाक्यता आढळंत नाही. एलिझाबेथ हरलॉक ने वयाच्या ६० वर्षापासून वृध्दत्वाची सुरूवात होते असे प्रतिपादन करून वृध्दावस्थेचे दोन कालावधीत विभाजन केले. a) वय वर्षे ६० ते ७० वर्षे b) ७० वर्षानंतरची अवस्था तर जेरेम टनस्टॉल यांनी Old and Alone या ग्रंथात अमेरिकेत ६५ वर्षावरील व्यक्तीचा वृध्दामध्ये समावेश करण्यात येते असे नमुद केले आहे. तर स्वीडन मध्ये वयाच्या ६७ व्या वर्षापासून वृध्दापकाळाची सुरूवात होते असे



Scanned with OKEN Scanner

मानले जाते. के.एस. सुडाने यांनी Aging in India या ग्रंथात ज्यानी वयाची ५५ वर्षे ओलांडली त्यांना वृध्द म्हटले आहे तर व्हिक्टर डिसोझा यांनी भारतातील वृध्दांचा अभ्यास केला व वय वर्षे ७५ पूर्ण झालेल्या व्यक्तीला वृध्द म्हणून संबोधले. डॉ. डी. पाल. चौधरी यांनी ६५ वर्षावरील व्यक्तीला वृध्द म्हटले पाहिजे असे मत व्यक्त केले.

वरीलप्रमाणे वृध्दत्वाचा प्रारंभ वयाच्या कोणत्या वर्षी होतो याबाबत अभ्यासकामध्ये मतभिन्नता आढळते. कारण वेगवेगळ्या देशात वृध्दपकाळाची वयोमर्यादा वेगवेगळी मानली जाते. भारतामध्ये साधारणपणे ६० वर्षानंतर व्यक्ती सेवानिवृत्त होते. वृध्दाश्रमामध्ये ६० वर्षावरील व्यक्तीला प्रवेश दिला जातो म्हणून वयाची ६० वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तींना वृध्द म्हणता येईल असे वाटते.

**वृध्दावस्था आणि सामाजिक संदर्भ :**

आधुनिक औद्योगिक समाजात वृध्दांच्या समस्या वृध्दांच्या भोवतीच निर्माण झालेल्या आढळतात त्या अर्थाने की अलिकडच्या काळात संयुक्त कुटुंब पध्दतीचा झालेला ज्हास केंद्र तथा विभक्त कुटुंब पध्दतीचा झालेल्या स्वीकार ते एकल कुटुंब इथपर्यंत झालेली कुटुंब संस्थेची स्थित्यांतरे आणि औद्योगिक समाजात सर्व क्षेत्रात विविध पदावरून कार्यात असणाज्या व्यक्तींसाठीची सक्तीची विशिष्ट वय पूर्ण केल्यानंतर असणारी सेवानिवृत्ती अशा या निवृत्तीमुळे व्यक्तीच्या कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक जीवनात जी स्थित्यांतरे घडतात. ती स्थित्यंतरे वृध्दांच्या समस्यांच्या मुळाची आढळतात उदा. व्यक्तीचे आर्थिक उत्पन्न थांबते किंवा तुटपुंजे बनते. अशा स्थितीत सामाजिक आर्थिक प्रतिष्ठा कमी होते. त्यामुळे कुटुंबातील स्थान पूर्वी इतकेच महत्त्वाचे राहीलच असे नाही. परिणामी निवृत्ती म्हणजेच वृध्दत्वाची सुरूवात होय असे समीकरण मनात रूढ होते. अशा स्थितीत सेवानिवृत्त व्यक्ती अनेक बाबतीत इतरांवर अवलंबून बनते. कुटुंबात ताणतणाव वाढतात. अनेकदा जोडीदार या जगातून गेलेला असतो. एकाकी जीवन वाट्याला येते. हा वृध्दत्वाच्या अवस्थेशी संबंधित असणारा सामाजिक संदर्भ अत्यंत महत्त्वाचा असून तो लक्षात घेतल्याशिवाय वृध्दावस्थेचा समाजशास्त्रीय अर्थ स्पष्ट होऊ शकणार नाही.

**वृध्दांची संख्या :**

कोणत्याही देशातील लोकांच्या सरासरी आयुर्मानावर वृध्दांची संख्या अवलंबून असते. An Aging World २०१५ च्या अहवालनुसार जगामध्ये ८.५ टक्के लोकसंख्या ही ६५ वर्षावरील असून २०५० पर्यंत जागतिक लोकसंख्येत वय वर्षे ६५ असणारी लोकसंख्या ही एकूण लोकसंख्येच्या १७ टक्क्यावर पोहचेल असे मानले जाते. आज वयस्क लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक असणारा देश जपान असून तेथील लोकसंख्येच्या २७ टक्के लोकसंख्या ही ६५ वर्षावरील आहे. २०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतीय लोकसंख्येमध्ये ६० वर्षावरील लोकसंख्या ८.०५ टक्के आहे. इ.स. २०२५ पर्यंत भारतीय लोकसंख्येत वृध्दांचे प्रमाण १२.३ टक्के वाढलेले असेल असा तज्ज्ञाचा अंदाज आहे.

भारतीय लोकसंख्येतील वृध्दांचे प्रमाण

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | ६० वर्षावरील लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| १९५१ | ३६.१ | ६.३% |
| १९६१ | ४३.९ | ५.७% |
| १९७१ | ५४.८ | ५.२% |
| १९८१ | ६८.३ | ६.२% |
| १९९१ | ८४.५ | ६.८% |
| २००१ | १०२.७ | ७.४% |
| २०११ | १२१.० | ८.०५ |

उपरोक्त सारणीवरून भारतातील एकूण लोकसंख्या जसजशी वाढत जात आहे. तशतशी वृध्दांची संख्या ही वाढत जाण्याबरोबरच लोकसंख्येतील वृध्दांचे प्रमाण ही वाढत आहे. जसजसे लोकसंख्येतील वृध्दांचे प्रमाण वाढत जाते तसतसे वृध्दांच्या समस्यांची तीव्रता वेगाने समोर येत आहेत.

वृध्दावस्था ही व्याधी किंवा रोग नाही असे असले तरी वृध्दावस्थेच्या काळात अनेक शारीरिक आणि मानसिक व्याधी निर्माण होतात. वृध्दावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. त्यामुळे वृध्द व्यक्तीची योग्य काळजी घेणे सेवासुश्रुषा करणे, मानसिक आणि कौटुंबिक शांतता लाभणे आवश्यक असते. परंतु अनेकदा असे घडत नाही. वृध्दांकडे दुर्लक्ष केले जाते या सर्व बाबींचा परिणाम वृध्दांच्या कौटुंबिक भूमिकेवर आणि कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक संबंधावर होवून वृध्दावस्थेत अनेक समस्या निर्माण होतात.

**सामाजिक सुरक्षा आणि वृध्दांच्या समस्या :**

पारंपारिक समाजात कुटुंब, नातेवाईक आणि धार्मिक संस्थाद्वारे वृध्दांना संरक्षण दिले जात होते. परंतु आधुनिक काळात औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण, शहरीकरण, व्यक्तीवाद, भौतिकवादी तत्वज्ञान, संयुक्त कुटुंब व्यवस्थेचा ज्हास यासारख्या बाबींमुळे समाजात शीघ्रगतीने परिवर्तन घडून येत आहे अशा बदलत्या स्थितीत कुटुंब व्यवस्था वृध्दांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचे कार्य प्रभावीपणे करू शकत नाही. त्यामुळे राज्य संस्था सामाजिक सुरक्षेच्या कार्यात अग्रेसर ठरत आहे. म्हणजेच एकाअर्थाने वृध्दांच्या सामाजिक सुरक्षेचे कार्य एका संस्थेकडून दुसज्या संस्थेकडे संक्रमित



Scanned with OKEN Scanner

होत आहे.

इंग्लड, अमेरिका, डेन्मार्क यासारख्या देशात वृध्दकल्याण कार्यक्रम वृध्दांना सामाजिक सुरक्षा देण्याच्या दृष्टीने सुरू करण्यात आला आहे. जे वृध्द एकाकी जीवन जगतात त्यांना १९४६ च्या राष्ट्रीय आरोग्य सेवा कायद्याअंतर्गत आरोग्यविषयक मदत दिली जाते. वृध्दापकालीन धर्मदाय संस्थांकडून वृध्द निराश्रितांना मदत केली जाते. आयर्लंडमध्ये विशिष्ट वर्ष नौकरी करणारांना एकसमान दराने निवृत्तीवेतन दिले जाते. बेल्जियमध्ये सर्व वृध्दांना वेतन मिळते. रशिया व अमेरिकेत कमी वेतन घेणाज्या व्यक्तींना अधिक निवृत्ती वेतन दिले जाते. चीनमध्ये १० ते १४ वर्षे सेवा करणारास वेतनाच्या ६० टक्के व १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त सेवा करणारास वेतनाच्या ७० टक्के निवृत्ती वेनत प्राप्त होते. भारतात मात्र इ.स. २००५ नंतर शासकीय, निमशासकीय सेवेत आलेल्या व्यक्तींना निवृत्ती वेतनाच्या लाभापासून परावृत्त करणारा नवा कायदा करण्यात येवून संपूर्ण निवृत्ती वेतनाऐवजी अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे नजीकच्या काळात २००५ नंतर सेवेत आलेल्या व्यक्ती जेंव्हा सेवानिवृत्त होतील तेंव्हा खज्या अर्थाने अशा सेवानिवृत्त झालेल्या लोकांच्य समस्या सामोरे येण्यास सुरूवात होवून सेवानिवृत्त वृध्दांच्या समस्यांची तीव्रता लक्षात येईल असे दिसते.

अशाप्रकारे विविध देशात वृध्दांना सामाजिक सुरक्षा मिळावी, त्यांच्या समस्यांची सोडवणुक व्हावी म्हणून विविध प्रकारचे कार्यक्रम आखण्यात आले असल्याचे आढळते.

**भारतातील वृध्दांसाठी सामाजिक सुरक्षा :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात ख्रिश्चन मिशनज्यांनी वृध्द कल्याणाची सुरूवात केली. वृध्दत्व कल्याण क्षेत्रात कार्य करणारी पहिली संस्था भारतात बेंगलोर येथे १८४० मध्ये The Friend in Need Society या नावाने स्थापन झाली, १८६५ मध्ये पुणे डेव्हिड ससून अशक्ताक्षम, १८८५ मध्ये कलकत्ता येथे Little Sisters of the Poor, १८९० मध्ये नागपूर येथे Home for aged and Handicaped, १९१२ मध्ये सुरत येथे अशक्त व्यक्तीसाठी आश्रम, मातृसेवा संघ नागपूरच्या वतीने १९६१ मध्ये पंचवटी हा वृध्दाश्रम उमरेड रोडवर सुरू करण्यात आला. वरोरा येथे उत्तरायण नावाचे वृध्दाश्रम सुरू झाले पुढे स्वयंसेवी संघटनांनी मुंबई, दिल्ली, लखनौ, मद्रास नागपूर यासारख्या मोठ्या शहरातून वृध्दाश्रम सुरू केले. यावरून वृध्दांच्या समस्या आहेत आणि त्यामुळे वृध्दाश्रमाची गरज भासली हे स्पष्ट होते.

याशिवाय भारत सरकारने वृध्दांच्या समस्या लक्षात घेऊन घटनेच्या कलम ४१ प्रमाणे वयोवृध्द आजारी व्यक्तीना मदत पुरवण्याची तरतुद केली आहे. १९५६ च्या Hindu Adoption and Maintance Act नुसार वृध्द किंवा आजारी आई वडिलांची काळजी घेण्याचे बंधन आहे. तसेच १९७३ च्या कलमाने कमावत्या आणि पुरेशी प्राप्ती असणाज्या व्यक्तीवर आई-वडिलांच्या पोषणाची जबाबदारी टाळण्यात आलेली आहे. तसेच याच कायद्याने वृध्दांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी वृध्दाश्रम, दिनकेंद्रे, गृहसेवा व्यवस्था, निवृत्तीवेतन भविष्यकाळातील निर्वाह निधी, वृध्दपकालीन निवृत्ती वेतन यासारखे अनेक उपक्रम सुरू केलेले आहेत.

केंद्रीय समाजकल्याण बोर्डाकडून वृध्दाश्रम सुरू करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते Help Age ही संस्था वृध्दाश्रमाच्या क्षेत्रात विशेष कार्य करत आहे. याशिवाय कर्मचारी भविष्कालीन निर्वाह निधी कायदा १९५२ लागू करण्यात आला. केंद्र सरकारने १९६४ मध्ये कुटुंब सेवानिवृत्ती वेतन योजना सुरू केली. १९७२ मध्ये अनुग्रह रक्कम कायदा पारीत केला. १९५७ मध्ये मध्यप्रदेश सरकारने सर्वप्रथम वृध्दपकालीन निवृत्तीवेतन कायदा पारीत केला. महाराष्ट्र सरकारने १९७८-७९ मध्ये संजय गांधी निराधार योजना या नावाने निराधार वृध्द व्यक्तींना वेतनाची तरतुद केली. याशिवाय महाराष्ट्रामध्ये ६५ वर्षावरील नागरीकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत तसेच इंडियन एअरलाईन्सच्या प्रवास भाड्यात ५० टक्के सूट, २५० कि.मी. पेक्षा जास्तीच्या प्रवासात रेल्वेत द्वितीय वर्गाकरीता प्रवास भाड्यात १५ टक्के सुट आहे. याशिवाय इन्कम टॅक्समध्ये जेष्ठ नागरिकांना सलवत देण्यात आलेली आहे.

वृध्दांच्या कल्याणाचे कार्ये करणारे जेष्ठ नागरिक संघ, पेन्शनर्स असोसिएशन इ. स्वयंसेवी संघटना वृध्दांच्या कल्याणाचे कार्यक्रम राबवतात भारतात अशा ७०० संस्था असून महाराष्ट्रात त्यांची संस्था १९० आढळते.

**संदर्भ :**

१) आगलावे प्रदिप- जुलै २००९, भारतीय समाज, प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) गोरे अशोक- जून २०१५, भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) कज्हाडे बी.एम. -जून २०१०, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४) कुलकर्णी पी.के.-१९९८, भारतीय सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) लोटे रा.ज.- जून २०१५, भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

६) माने माणिक-जुलै १९९७; भारतातील समकालीन समस्या,



Scanned with OKEN Scanner

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३७ वे, अंक २४ वा, डिसेंबर, २०१९.

Shri. Siddheshwar Mahavidyalaya • Majalgaon Dist.Beed-431131(MH)

भारतातील समाजशास्त्राची [illegible] विशेषांक

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

Scanned with OKEN Scanner

ISSN 2230-7745

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारतातील समाजशास्त्र अध्ययन शतकपूर्ती | डॉ. उत्तम भोईटे | ...१ |
| २. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. पी. जी. जोगदंड | ... ४ |
| ३. | महाराष्ट्रातील सामाजिक चिंतन | डॉ. जगन कराडे | ... ६ |
| ४. | भारतातील सामाजिक चळवळीबाबत समाजशास्त्रीय संशोधकांची उदासीनता | डॉ. प्रदीप आगलावे | ...१२ |
| ५. | मानवशास्त्राची वाटचाल : महाराष्ट्रातील साहित्य आणि संशोधन परंपरा | डॉ. शौनक कुलकर्णी | ...१४ |
| ६. | कमला भसीन : एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ | प्रा. संदीप चौधरी | ... १८ |
| ७. | शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण.... | डॉ. धनराज पाटील | ...२० |
| ८. | दलित अभिजनासंबंधीचा अभ्यास..... | प्रा. प्रियदर्शन भवरे | ...२५ |
| ९. | स्वात्यंत्रोत्तर भारतातील निवडक समाजशास्त्रीय संशोधने | डॉ. एन. टी. कांबळे | ...३४ |
| १०. | प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा. संजय कांबळे | ...४० |
| ११. | डॉ. सुधाताई काळदाते : चतुरस्त्र समाजशास्त्रज्ञ | डॉ. स्मिता अवचार | ...४९ |
| १२. | पीएच. डी. संशोधन पर्व : निकड बदलाची | डॉ. नारायण चौधरी | ...५१ |
| १३. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. श्रीकांत गायकवाड | ...५३ |
| १४. | भारतातील समाजशास्त्र विषयाची शताब्दी अवलोकन आणि वाटचाल | डॉ. बालाजी केंद्रे | ...५८ |
| १५. | मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल | डॉ. सोंडगे, डॉ. मोटे | ...६० |
| १६. | समाजशास्त्राच्या विकासात रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे योगदान | डॉ. बी. के. स्वाई | ...६२ |
| १७. | भारतीय समाजशास्त्राचा विकास : आव्हाने आणि भवितव्य | डॉ. भगवान मनाळ | ...६४ |
| १८. | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम | डॉ. कालीदास भांगे | ...६७ |
| १९. | प्रसार माध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव... | डॉ. मोहन नगराळे | ...७१ |
| २०. | वर्तमानकाळात विवाहसंस्थे समोरील आव्हाने... | डॉ. दिपक पवार | ...७३ |
| २१. | भारतीय समाजशास्त्राच्या विकासात मुबई विद्यापीठाचे योगदान | डॉ. धारबा गणवीर | ...७५ |
| २२. | वाडत जाणारी वृध्दांची लोकसंख्या: एक नवे आव्हान | डॉ. राजेंद्र बगाटे | ...७७ |
| २३. | भारतात समाजशास्त्राचा विकास | डॉ. रामेश्वर मोरे | ...८० |
| २४. | ई–सिगारेट: सामाजिक समस्या | डॉ. रविंद्र विखार | ...८३ |
| २५. | भारतामधील समाजशास्त्राच्या विकासात समाजशास्त्रज्ञांचे योगदान | डॉ. प्रतिभा बिरादर | ...८५ |
| २६. | भटक्या–विमुक्त जमातींच्या चळवळींची विचारसरणी | डॉ. अर्जुन जाधव | ...८७ |
| २७. | ग्रामविकास कार्यक्रमविषयक स्थानिक प्रशासकीय यंत्रणेचा दुष्टिकोण | डॉ. साहेबराव हिवाळे | ...९३ |
| २८. | महाविद्यालयीन स्तरावरील समाजशास्त्र अभ्यासक्रमाविषयी शिक्षकांची ..... | डॉ. मंजुषा नळगीरकर | ..९७ |
| २९. | भारतीय प्रसारमाध्यमातील जातीवाद | डॉ. प्रदीप गजभिये | ..१०० |
| ३०. | बाधुनिक भारतातील स्त्रीभ्रूण हत्या | डॉ. हेमंत सोनकांबळे | ..१०२ |
| ३१. | आदिवासी जमातींचे बदलते स्वरूप | प्रा. मनोहर येरकलवार | ..१०५ |
| ३२. | सायबर गुन्हा आणि सायबर सुरक्षितता: उक अध्ययन | डॉ. ज्योती पोटे | ..१०८ |
| ३३. | भारतातील ग्रामीण विकास | डॉ. श्रीराम खाडे | ...१११ |
| ३४. | ई–साक्षरता : शिक्षण क्षेत्रातील नवप्रवाह | डॉ. नलिनी बोरकर | ..११३ |
| ३५. | २९ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | डॉ. दिपक पवार | ..११६ |




Scanned with OKEN Scanner

Shri.Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed 431131(MH)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल

डॉ. सोंडगे ता.प., समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव जि.बीड tpsondge@gmail.com 9814548480
प्राचार्य डॉ. दादासाहेब उ. मोटे, माजी सचिव मराठी समाजशास्त्र परिषद, dada.mote77@gmail.com 9423732424

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने या वर्षी म्हणजे २०१९ मध्ये 'भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती' या विषयावर मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठीचा अंक प्रकाशित करण्याचे ठरविले आहे, त्याबद्दल प्रथमत: मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीचे अभिनंदन.

व्यक्ती जेंव्हापासून समाजाचा विचार करु लागली तेंव्हा पासून सामाजिक तत्वज्ञान निर्माण होऊ लागले असे मानले जाते. नाव आणि अभ्यास विषयातील सारखेपणा यामुळे सामाजिक तत्वज्ञान व समाजशास्त्र ही अत्यत जवळची शास्त्रे आहेत असेही म्हणता येईल. नव्हे तर १८ व्या शतकापर्यंत सामाजिक तत्वज्ञानामध्येच समाजाचा आणि सामाजिक विचारांचा अभ्यास केला जात असे. याचा अर्थ असा होतो की, समाजशास्त्र हे सामाजिक तत्वज्ञानाचाच एक भाग होते, परंतु मानवी विचारांची बैठक जस–जशी व्यापक होत' गेली तसतशी सामाजिक जिवनाचा अभ्यास करणाऱ्या सामाजिक तत्वज्ञानापेक्षा वेगळया शास्त्राची गरज भासू लागली आणि त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला. असे असले तरी भारतात समाजशास्त्रीय अभ्यासाची कल्पना खूप प्राचीन आहे. वेद, उपनिषेद, रामायण, महाभारत, मनुस्मृती, सूत्रे व पुराणे या सारख्या धार्मिक ग्रंथामध्ये सामाजिक जिवनाची सांगोपांग चर्चा आढळते तसेच चाणक्य लिखीत 'अर्थशास्त्र' व शुक्राचार्याचे 'नितीसार' या ग्रंथात व्यवहारिक सामाजिक कल्पना व समाज, शासन, निती इत्यादी विषयाची चर्चा आढळते. अबुल फजलच्या 'ऐनी अकबरी' या ग्रंथात तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीचे वर्णन आढळते. याशिवाय विविध ग्रंथकारांनी धार्मिक ग्रंथाद्वारे चांगल्या आचरणाचे नियम सांगितलेले आहेत. यासारख्या बाबीवरुन असे म्हणता येईल की, भारतात धर्मशास्त्रातच समाजशास्त्राचा अंतर्भाव करण्यात आलेला होता.

भारतामध्ये सर्वप्रथम इ.स. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण देण्यासाठी प्रा. पेट्रीक गेंडिस यांच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. तेंव्हापासूनच लौकिक अर्थाने भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाची सुरुवात झाली. इ.स. १९२४ मध्ये डॉ. गो.स. घुर्ये हे समाजशास्त्र विभागाचे अध्यक्ष झाले व त्यानंतरच्या काळातच समाजशास्त्राच्या अभ्यासाला व संशोधनाला भारतातील वेगवेगळया विद्यापीठात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. आज महाराष्ट्रातील जवळपास सर्वच विद्यापीठे आणि या विद्यापीठांशी संलग्नीत असणाऱ्या बहुतांशी महाविद्यालयातून समाजशास्त्र हा विषय अभ्यासला जात असून विद्यार्थीही या विषयाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ देखील अपवाद नाही.

१९५८ मध्ये ज्यावेळेस मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली त्यावेळेस या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नांदेड आणि परभणी असे पाच (०५) जिल्हे होते. पुढे मराठवाड्यात जालना, लातूर व हिंगोली असे नवीन तीन जिल्हे अस्तित्वात आले. प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने नांदेड येथे या विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यात आले. इ. स. १९७८ नंतरच्या काळात मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्ताने उद्भवलेले आंदोलन आणि नंतरच्या काळात त्याचा सतत झालेला पाठपुरावा व प्रयत्न यामधून १९९४ मध्ये मराठवाडा विद्यापीठाचे विभाजन होऊन औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद या चार जिल्ह्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्ह्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अशी दोन स्वतंत्र विद्यापीठे मराठवाड्यामध्ये अस्तित्वात आली. पुढे प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे उपकेंद्र उस्मानाबाद येथे इ. स. २००४ मध्ये तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे उपकेंद्र २००७–०८ मध्ये लातूर येथे स्थापन करण्यात आले.

मराठवाडा विद्यापीठाची स्थापना जरी १९५८ मध्ये झालेली असली तरी विद्यापीठामध्ये समाजशास्त्र हा विषय अध्ययनासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध नव्हता. प्रथमत: देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथे हा विषय अध्ययनासाठी उपलब्ध करुन दिला गेला. त्यानंतर १९६७ मध्ये समाजशास्त्र हा विषय पदव्युत्तर पातळीवर तत्कालिन मराठवाडा विद्यापीठात अध्ययनासाठी उपलब्ध झाला. सुरुवातीच्या काळात डॉ. एम. जी.कुलकर्णी, डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. विजय देशपांडे, डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. अनुराधा भोईटे अशी दिग्गज मंडळी या विषयाच्या अध्ययनासाठी उपलब्ध झाली. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते विद्यापीठांतर्गत या विषयाच्या पदव्युत्तर पातळीवरील अध्ययनाला सुरुवात होण्यापासूनचा इतिहास मांडण्याचा हेतू एवढाच की, एकतर नवीन पिढीला या संदर्भातील तितकीशी माहिती नाही आणि दुसरे म्हणजे विद्यापीठामध्ये अध्ययनासाठी उपलब्ध असणाऱ्या पहिल्या पिढीतील मंडळींनी मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या आठही जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांना प्रत्येक भेटी देऊन प्राचार्य व संस्थाचालक यांच्याशी विचार विनिमय करुन समाजशास्त्र हा विषय महाविद्यालयीन पातळीवर पदवी आणि पद्व्युत्तर अध्ययनासाठी सुरु करण्याकरीता जे परिश्रम घेतले त्यास तोड नाही. त्यांच्या परिश्रमाचाच परिपाठ म्हणून आज बहुतांशी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना किमान पदवी पातळीवर व काही मोठ्या महाविद्यालयामधून पदव्युत्तर पातळीवर हा विषय अध्ययनासाठी उपलब्ध झालेला आहे. सद्य:स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्गत जवळपास १२५ हून अधिक महाविद्यालयामधून समाजशास्त्र हा विषय शिकविला जात आहे.

'भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती' या विषयाच्या अनुषगाने महाराष्ट्राच्या अंतर्गत विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधून समाजशास्त्र विषयाची वाटचाल या संदर्भातील मराठवाडा विद्यापीठाचे योगदान विविध अंगाने महत्वपूर्ण राहिलेले आहे. याची माहिती नवीन पिढीला व्हावी या उद्देशाने आम्ही खालील मुद्द्यांची सविस्तरपणे मांडणी करु इच्छितो.

१) ज्या मराठी समाजशास्त्र परिषदेने हा विषय संशोधन पत्रिकेच्या लेखासाठी उपलब्ध करुन दिला त्या परिषदेची पायाभरणी तथा स्थापना याच विद्यापीठामध्ये झाली. डॉ. एम. जी. कुलकर्णी, डॉ. सुधा काळदाते, डॉ. विजय देशपांडे, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. आर. बी. बिलावर, डॉ. अनुराधा भोईटे, डॉ. बा. ल. जोशी, डॉ. पु. ल. भांडारकर (नागपूर विद्यापीठ), डॉ. विलास संगवे आणि डॉ. एस. एन. पवार (शिवाजी विद्यापीठ), डॉ. वाय. बी. दामले (पुणे विद्यापीठ), डॉ. शैलेजा जोशी, डॉ. धीरेंद्र नारायण या सर्वांनी मिळून मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना इ. स. १९८१ मध्ये केली. मराठी समाजशास्त्र परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. एम. जी. कुलकर्णी यांची निवड झाली आणि त्यांच्याच अध्यक्षतेखालील कार्यकारिणीने दि. २७ जून १९८३ रोजी धर्मादाय आयुक्ताकडून परिषदेच्या नोंदणीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले. त्यापूर्वी १२ ते १४ फेब्रुवारी १९८१ मध्ये डॉ. सुधाताई काळदाते यांच्या नेतृत्वाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील 'Indian Society of Criminology' चे अधिवेशन घेण्यात आले होते. सदरील अधिवेशनाचे नेटके नियोजन, उपस्थित प्रतिनिधी आणि एकुणच अधिवेशनाची यशस्वीता याच बळावर मराठी समाजशास्त्र परिषदेची स्वतंत्रपणे स्थापना झाली. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सुरुवातीच्या चार (०४) अधिवेशनामध्ये प्रतिनिधींचा सहभाग जरी कमी प्रमाणामध्ये जाणवला असला तरी त्यावेळी महाविद्यालयांची संख्याही मर्यादीत होती हे लक्षात घेतले पाहिजे. मराठी समाजशास्त्र परिषदेचे ५ वे अधिवेशन समाजशास्त्र विभागाच्या वतीने पैठण जिल्हा औरंगाबाद येथे 'कडा' च्या सहकार्याने घेण्यात आले. त्यास प्रतिसादही चांगला मिळाला. त्यानंतर मात्र परिषदेला



Scanned with OKEN Scanner

मागे वळून पाहण्याची आवश्यकता भासली नाही. आज मराठी समाजशास्त्र परिषदेचे एक हजाराच्या (१०००) वर अजिव सभासद असून परिषदेचे सद्य:स्थितीत वटवृक्षामध्ये रुपांतर झालेले दिसते. यामध्ये पूर्वाश्रमीच्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे मोठे योगदान आहे.

२) मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अर्थात, आजचे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड) अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या प्रसारासाठी या विद्यापीठातील विभागाने प्रयत्नपूर्वक जिद्दीने काम केले. महाविद्यालयीन पातळीवर केवळ विषयाची सुरुवातच नाही तर महाविद्यालयीन पातळीवर कार्यरत असणारा व्याख्यात्यांचा वर्ग अधिक व्यासंगी बनावा, तयार व्हावा, यादृष्टीनेही खूप मेहनत घेतली. संशोधनाच्या दृष्टीने जाणिवपूर्वक प्रयत्नही केले. 'संशोधन पध्दती' या विषयावर विद्यापीठ पातळीवर व्याख्यात्यांची दोन दिवशीय कार्यशाळा यु.जी.सी. च्या सहकार्याने घेऊन त्यातून संशोधन पध्दती च्या बाबत व्याख्यात्याकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करुन घेतली. याचा परिणाम म्हणून समाजशास्त्र विभागांतर्गत गुणवत्तापूर्ण तथा दर्जेदार संशोधन कार्याच्या वाढीस चालना मिळण्यास मदत झाली. उदाहरणच द्यायचे झाल्यास डॉ. सुधाताई काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगिक समाजशास्त्राच्या अंतर्गत डॉ. कातखेडे यांनी 'Human Relations in industries' या विषयावरील त्यांच्या संशोधन कार्यामुळे डॉ. कातखेडे यांची 'झालानी टुल्स इंडस्ट्रीमध्ये' जनरल मॅनेजर म्हणून निवड झाली. सध्या रोह्यामध्ये त्यांची स्वत: ची स्वतंत्र इंडस्ट्री आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या वेळेस तत्कालिन महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक डॉ. अय्यंगार यांनी स्वत: औरंगाबाद येथे येऊन डॉ. सुधाताई काळदाते यांच्याशी चर्चा करुन डॉ. दादासाहेब मोटे यांचा एम. फिल. पदवीचा प्रबंध मराठवाड्यात सुरक्षेच्या दृष्टीने झेरॉक्स करुन घेऊन गेले होते. अशा प्रकारे मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागांतर्गत झालेल्या संशोधन कार्याने भारत गोताली भूमिका पार पाडला असल्याचे वेळोवेळी निदर्शनास येत गेलेले आहे. याविषयी दुमत असण्याचे कारण नाही.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाच्या वाटचालीच्या अनुषंगाने आणखी एक महत्वाचा जो भाग वाटतो तो म्हणजे यु.जी.सी. च्या आर्थिक सहाय्याने ULP (University Leadership Programme) प्रकल्प मराठवाड्यातील बहुतांश महाविद्यालयामध्ये राबविला गेला. या प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातील सर्व प्राध्यापकांनी विविध महाविद्यालयामध्ये विद्यार्थी आणि व्याख्याते यांच्यासमोर व्याख्याने दिली. त्यामुळे विषयाचे विद्यार्थी अधिक सजग होण्यास मदत झाली. यु.जी.सी. च्या याच अनुदानामधून महाविद्यालय पातळीवर पदवीसाठी असणारा 'भारतीय समाज : पारंपारिक आणि आधुनिक' या पेपरवरील उत्कृष्ट ग्रंथ प्रकाशित करुन अत्यल्प किंमतीमध्ये महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आला. आजही हा ग्रंथ उपयोगी ठरतो आहे.

४) विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचा आणखी एक महत्वकांक्षी प्रकल्प म्हणजे US AID आणि IIPS देवनार, मुंबई यांच्या सहकार्याने उस्मानाबाद आणि परभणी जिल्ह्यामधील शासकीय आरोग्यविषयक सुविधा या संदर्भातील सर्व्हे, हा सर्व्हे १३ ऑक्टोबर १९८२ ते ३१ मार्च १९८३ या सहा महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात आला. या प्रकल्पाला मान्यता मिळण्यापूर्वी लातूरचा समावेश उस्मानाबाद जिल्ह्यात तर हिंगोलीचा समावेश परभणी जिल्ह्यात होता. या संपूर्ण प्रकल्पाला US AID कडून अनुदान प्राप्त झालेले होते. या Base Line Survey चा परिणाम म्हणून उस्मानाबाद आणि परभणी जिल्ह्यामध्ये आरोग्यविषयक सेवासुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत झाली.

५) इ.स. १९८१ मध्ये ज्या विद्यापीठात मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना झाली. त्याच विद्यापीठाच्या अंतर्गत ३ वेळा परिषदेची सूत्रे हाती आली आणि प्रत्येक वेळेस मराठी समाजशास्त्र परिषदेला आर्थिकदृष्ट्या समृध्द बनविण्याचा प्रयत्न केला गेला. सद्य:स्थितीमध्ये मराठी समाजशास्त्र परिषद जोमाने कार्यरत असून तिची अजीव सभासद संख्या ही वाढत आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारे नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. अलिकडच्या काळात मराठी समाजशास्त्र परिषद महाराष्ट्रा बाहेर परिषदांचे तथा अधिवेशनांचे यशस्वीरित्या आयोजन करु लागली आहे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत विविध महाविद्यालयामधील समाजशास्त्राच्या अभ्यासकांची विद्यापीठातील विभागाशी नाळ जोडण्यामध्ये विभागातील पहिली पिढी जितकी प्रभावी आणि परिणामकारक राहिली ती परंपरा ती नाळ जोडण्यामध्ये, कायम ठेवण्यामध्ये दुसऱ्या, तिसऱ्या पिढीला तितकेसे यश आलेले नाही. या मागील कारणेही वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतील. जसे की, काळाच्या ओघामध्ये स्थानिक पातळीवरील महाविद्यालयांमध्ये उपलब्ध झालेल्या पदव्युत्तर शिक्षणाच्या सेवा सुविधा यामुळे महाविद्यालयीन शिक्षकांचा अभ्यासकांचा विद्यापीठातील विभागाशी असणारा संपर्क कमी होत गेला. विद्यार्थी देखील स्थानिक महाविद्यालयाला पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्रधान्य देऊ लागले. यामधून विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाशी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचा संपर्क कमी होत गेला असला तरी समाजशास्त्र विषयाची घोडदौड सातत्याने होत राहिली, ही निश्चितच आनंददायी बाब मानता येईल.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत बहुतांशी महाविद्यालयामधून समाजशास्त्र हा विषय शिकविला जात असला व हा विषय बहुतांशी विद्यार्थी अध्ययनासाठी निवडत असले तरी औरंगाबाद शहर वगळता विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जालना, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांमधील कोणत्याही महाविद्यालयामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेची अधिवेशने होऊ शकली नाहीत. एवढेच नव्हे तर विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग देखील मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन घेऊ शकलेला नाही. मागील काळामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेची अधिवेशने विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये व्हावीत अशी अपेक्षा करण्यात हरकत नाही.

८) विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने चर्चासत्र, कार्यशाळा यासारखे उपक्रम आजही राबविले जात आहेत. विभागाचा या कामी सतत पुढाकार राहिलेला आहे. अलिकडील काळात महाविद्यालयीन पातळीवर राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिषदांचे आयोजन केले जात आहे. यामधून प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो आहे. त्यामुळे समाजशास्त्र हा विषय आणि समाशास्त्रीय संशोधन अधिकाधिक विद्यार्थी, वाचकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होत आहे.

९) सद्य:स्थितीमध्ये विद्यापीठाच्या अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या वाढीमध्ये आपले योगदान देणाऱ्यांपैकी पहिल्या पिढीतील डॉ. उत्तमराव भोईटे आणि डॉ. बी. एल. जोशी वगळता अन्य कोणी हस्ती हयात असल्याचे आढळत नाही. सर्वच काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत. या विद्यापीठाच्या अंतर्गत या पहिल्या पिढीने जो पाया घातला त्या पायावर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाची आणि या विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागांची वाटचाल यशस्वीपणे सुरु आहे.

सारांश : 'भारतातील समाजशास्त्र विषयाची शतकपूर्ती' या मुख्य विषयाच्या अनुषंगाने एकीकडे समाजशास्त्र विषयाची वाटचाल आणि दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल या दोन्ही बाबींचा वेध घेता यावा व त्याचबरोबरीने नवीन पिढीला याची थोडीफार माहिती व्हावी या उद्देशाने या लेखांची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवीन पिढी समाजशास्त्र विषयाची आणि मराठी समाजशास्त्र परिषदेची यशस्वी घोडदौड अशीच पुढे चालू ठेवेल व समाजशास्त्र हा विषय अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवेल अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करुन या लेखापुरता हा लेखन प्रपंच थांबवतो.



Scanned with OKEN Scanner

19-20

# भारतीय समाजातील शिक्षणामधील लिंगभेदभाव

डॉ. तात्याराम परमेश्वर सोंडगे

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगांव

Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed-431131(MH)

प्रस्तावना :

स्त्रियांचे सबलीकरण तथा सक्षमीकरण या संकल्पनेचा उदय १९७० च्या मध्यावर स्त्री चळवळीतून झाला. सेन आणि ग्रोन या अभ्यासकांनी नौरोबी येथील परिषदेसाठी १९८५ मध्ये जे पुस्तक प्रसिध्द केले तेंव्हा पासून स्त्रियांचे सबलीकरण या शब्दाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर वापर सुरू झाला. सक्षमीकरण ही संकल्पना विकास विषयक चर्चाविश्वात गेल्या २०-२५ वर्षात वापरली जात आहे. सक्षमीकरण या शब्दाची एकच एक अशी अधिकृत व्याख्या आढळत नाही. परंतु दुर्बल किंवा ओरबाडले गेलेले समाजातील गट पुन्हा एकदा संसाधने आणि निर्णयशक्ती यावर नियंत्रण आणि वाट मिळवून सक्षम होणे असा अर्थ समक्षमीकरणाचा नक्की आहे. दुर्बल तथा दडपल्या गेलेल्या वर्गामध्ये स्त्रियांचे दुर्बल होणे अधिकच तीव्र असते.

समाज कोणताही असो तेथील रहिवाश्यांच्या विकासाचा मुख्य घटक शिक्षण हाच असतो. स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना त्यांचे स्वातंत्र्य उपभोगण्याची आणि संसाधने, मालमत्ता, उत्पन्न व त्यांच्या स्वत:च्या वेळेचा फायदा आणि जोखीम व्यवस्थापित करण्याची त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याची क्षमता होय. हे सर्व शिक्षणाच्या माध्यमातून शक्य आहे. कारण मानवी विकासाचा मार्ग शिक्षणातून जातो. शिक्षणामुळे विकास प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास प्राप्त होतो. एवढेच नव्हे तर स्त्रिया आणि मुलींच्या शिक्षणाचा केवळ त्यांच्याच विकासावर नव्हे तर त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या पर्यायाने देशाच्या विकासावर देखील सकारात्मक परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. परंतु २१ व्या शतकाच्या प्रारंभी महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत असताना शिक्षणाच्या बाबतीत भारतीय समाजाची विशेषत: भारतीय स्त्रियांची आणि त्यामध्येही ग्रामीण स्त्रियांची स्थिती फारसी समाधानकारक आढळत नाही. जे काही शिक्षण आढळते ते साक्षरतेच्या पलीकडचे काही अपवाद वगळता पोहचलेले दिसत नाही.

गृहीतकृत्ये :

स्त्रियांचे समाजातील स्थान आणि भूमिकेबाबतचा पारंपारिक दृष्टीकोन भारतीय समाजातील शिक्षणामधील लिंगभेदभाव जबाबदार आहे.

शिक्षणातील लिंगभेदभावाचा अर्थ :

शिक्षण घेण्याची संधी मुलांना देणे आणि मुलींना नाकारणे म्हणजे शिक्षणातील लिंगभेदभाव होय. जागतिक लोकसंख्येत जवळपास अर्धा भाग स्त्रिया असून भारतीय लोकसंख्येत स्त्रियांची संख्या ४८.४६ टक्के आहे. परंतु शिक्षण, उत्पन्न, मालमत्ताविषयक अधिकार, वैवाहिक जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य यासारख्या बाबतीत पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया माघरलेल्या आहेत.

स्त्री शिक्षणाची संकल्पना :

सामाजिक परिवर्तनाची मुलभूत आवश्यकता स्त्री शिक्षण ही असून स्त्री शिक्षणाला दुय्यम लेखून परिवर्तन शक्य नाही. महात्मा गांधी असे म्हणतात की, स्त्री शिक्षण ही समाजाची मुलभूत आवश्यकता असून स्त्रियांची अवस्था जोपर्यंत सुधारणार नाही तोपर्यंत कुटुंबाची, समाजाची आणि पर्यायाने देशाची अवस्था सुधारणे शक्य नाही." स्त्रियांना जर शौक्षणिक विकासाची संधी मिळाली नाही तर त्याचा केवळ स्त्रियांच्या जीवनावरच नव्हे तर देशाच्या विकासावर देखील विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. कुटुंबाच्या हितासाठी आणि विकासासाठी स्त्रीने



Scanned with OKEN Scanner

शिक्षण घ्यावे एवढाच स्त्री शिक्षणाचा अर्थ सिमीत नाही. तर स्त्रीने स्वत:च्या आणि समाजाच्या पर्यायाने राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण घ्यावे असा स्त्री शिक्षणाचा अर्थ आहे. अर्थात हे शिक्षण स्त्रीला स्वतंत्र करणारे आणि सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य देणारे असले पाहिजे. नव्हे तर तीच काळाची गरज आहे. अन्यथा स्त्री शिक्षण केवळ साक्षरता निर्माण करण्याइतपतच मर्यादित राहिल व असे होणे स्त्री सबलीकरणासाठी आणि सामाजिक आर्थिक परिवर्तनासाठी फारसे पूरक राहणार नाही. भारतीय समाजातील स्त्री शिक्षणाचा विशेषत: ग्रामीण समाजातील स्त्री शिक्षणाचा विचार करता स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ७० वर्षानंतरही काही अपवाद वगळता स्त्री शिक्षण स्त्री साक्षरतेच्या पलीकडे सरकलेले आढळत नाही.

भारतीय समाजातील शिक्षणामधील लिंगभेदभावाचा ऐतिहासिक आढावा :

भारतात वैदिक कालखंडात स्त्री शिक्षणाची व्यवस्था अत्यंत प्रगत स्वरूपाची होती. मुलाप्रमाणेच मुलीवर देखील उपनयन संस्कार केले जात असत. ऋग्वेद काळात स्त्रियांना शिक्षण मुक्त होते. त्याचाच परिणाम म्हणून की काय गार्गी, मैत्रेयी यासारख्या स्त्रियांना 'विदुषी' असा लौकिक स्वकर्तृत्वावर प्राप्त होऊ शकला. परंतु पुढे उत्तर वैदिक कालखंडात स्त्री शिक्षणाच्या प्रगतीला ओहटी लागून स्त्रियांच्या दर्जात घसरण झाली. बौध्द काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. परंतु त्यासाठी त्यांनी गृहस्थी जीवनपध्दतीचा त्याग करून बौध्द भिक्षू व्हावे लागत असे. बौध्द भिक्षू झाल्यानंतरही स्त्री बौध्द भिक्षू व पुरूष बौध्द भिक्षू यांच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याचा दंडक पाळला जात असे. हा दंडक पाळण्याकडे दुर्लक्ष होण्यातून बौध्द कालीन शिक्षण व्यवस्था कोलमडून पडली व त्यानंतर स्त्री-पुरूष शिक्षणाबाबत सामाजिक विषमतेचे आणि लिंगाधिष्ठीत भेदभावाचे युग सूरू होऊन मुस्लीम राजवटीत. सुरक्षिततेच्या कारणावरून स्त्रियांवर अनेक बंधने येऊन त्या बंधनांचे रितीरिवाजात (प्रथा व परंपरात) रूपांतरण झाले. त्यातून स्त्रियांचा शिक्षणाशी संबंध तुटला. अर्थात मुस्लीम धर्मात स्त्री शिक्षणावर बंदी नव्हती. परंतु या काळात उच्च शिक्षण देण्याची कोणतीही व्यवस्था निर्माण झाली नाही. त्यामुळे मुस्लीम राजवटीचा काळ शिक्षणाच्या बाबतीत स्त्री-पुरूषांमध्ये विषमता निर्माण करणारा ठरला.

१९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात ि ाश्चन मिशनज्यांनी शिक्षणाच्या बाबतीतील स्त्री-पुरूषांमध्ये भेदभाव करणाज्या हिंदू समाजातील प्रथा परंपरा अमान्य करून मुलीनाही मुलांप्रमाणेच आधुनिक शिक्षण देण्यास सुरूवात केली. विशेषत: मुलीच्या प्राथमिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची जबाबदारी सरकारने घेतली. परंतु १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य युध्दामुळे सरकारी प्रयत्न फार दूर जाऊ शकले नाहीत.

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षणाच्या बाबतीत लिंगाधिष्ठीत भेदभावाचे तत्व नाकारणारे आद्य भारतीय समाजसुधारक असून त्यांनी सावित्रीबाई फुले यांना शिकवून मुलींना आधुनिक शिक्षणाचे धडे देणारी शिक्षिका तयार केली. शिक्षणाच्या बाबतीत लिंगाधिष्ठीत भेदभावाच्या प्रवाहाविरूध्द जाऊन कार्य करणाज्या समाजसुधारकांच्या प्रयत्नातून आधुनिक भारतात स्त्री शिक्षणाच्या कार्याला जरी गती प्राप्त झाली असली तरी साक्षरतेच्या संदर्भातील जनगणना .अहवालातील आकडेवारी लक्षात घेता शिक्षणाच्या बाबतीत भारतीय समाज विशेषत: भारतीय स्त्रिया माधारलेल्या दिसतात. १९५१ च्या जनगणना अहवालानुसार भारतीय लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण १८.३३ टक्के होते. त्यामध्ये पुरूष साक्षरतेचे प्रमाण २७.१६ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ८.८६ टक्के होते. यावरून असे दिसते की, १९५१ मध्ये स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणात १८.३० टक्के अंतर होते. २०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतीय लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७४.०४ टक्के आढळते. त्यामध्ये पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८२.१४ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६५.४६ टक्के आढळते. म्हणजेच स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणात १६.६८ टक्के एवढे अंतर आहे. यावरून हेच स्पष्ट होते की, १९५१ ते २०११ या ६० वर्षात भारताने साक्षरतेच्या बाबतीत बरीच प्रगती जरी केलेली दिसत असली तरी १९५१ ते २०११ या ६० वर्षात स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणातील तफावत केवळ १.६२ टक्क्यांनी कमी करणे आपल्याला शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील साक्षरतेचा विचार करता च्यद्दयत्यद्यत्दड्ढ ब्रह्मद्यद्धद्धड्डद्य दृढ ह्यद्दड्ढ २००४ नुसार डिसेंबर २००३ च्या पाहणी अहवालावरून ग्रामीण भारतातील साक्षरतेचे एकूण प्रमाण ५९.५ टक्के एवढे असून त्यामध्ये पुरूष साक्षरता ७१ टक्के तर स्त्री साक्षरता ४८ टक्के एवढी आहे. यावरून असेच दिसून येते की, ग्रामीण भारतातील स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणात २३ टक्के अंतर आहे.

निष्कर्ष :

१९५१ ते २०११ या ६० वर्षात भारताने साक्षरतेच्या बाबतीत बरीच प्रगती जरी केलेली दिसत असली तरी १९५१ ते २०११ या ६० वर्षात स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणातील तफावत केवळ १.६२ टक्क्यांनी कमी करणे आपल्याला शक्य झालेले असून आजही स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणात १६.६८ टक्के एवढे अंतर आहे. तर ग्रामीण भारतातील स्त्री-पुरूष साक्षरतेच्या प्रमाणात २३ टक्के एवढे अंतर आहे. यावरून हेच स्पष्ट होते की, भारतीय समाजातील



Scanned with OKEN Scanne

शिक्षणामधील लिंगभेदभावाची स्थिती आजही कायम असून भारतीय ग्रामीण स्त्रियांच्या शौक्षणिक माघारलेपणास लिंगाधिष्ठीत स्त्रियांचे समाजातील स्थान आणि भूमिके बाबतचा पारंपारिक दृष्टीकोन जबाबदार आहे.

संदर्भ :


१) आगलावे प्रदीप (२०१५). सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.

२) लोटे रा. ज. (२०१५). भारतीय समाज आव्हाने आणि समस्या.

३) विधुत भागवत (२००९. स्त्री-प्रश्न ची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने.

४) योजना (जुलै २०११). भारत की जनगणना.

५) समाजशास्त्र संशोधन पत्रिका (फेब्रुवारी २०१८). मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र.


Scanned with OKEN Scanne

JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH
(International Open Access Journal)
ISSN: 2349-5162

# Publication Fee Invoice & Conformation Letter

**Ref No : JETIR / Vol 7 / Issue 2 / 104**

**To,**
**Dr. Tatyaram Sondge**
**Published in : Volume 7 | Issue 2 | 2020-02-21**

**Subject:** Publication of paper at International Journal of Emerging Technologies and Innovative Research .

Dear Author,

With Greetings we are informing you that your paper has been successfully published in the International Journal of Emerging Technologies and Innovative Research (ISSN: 2349-5162). Thank you very much for your patience and cooperation during the submission of paper to final publication Process. It gives me immense pleasure to send the certificate of publication in our Journal. Following are the details regarding the published paper.

| | |
|---|---|
| About JETIR | : UGC and ISSN Approved - International Peer Reviewed Journal, Refereed Journal, Indexed Journal, Impact Factor: 5.87, ISSN: 2349-5162 |
| UGC Approval | : UGC and ISSN Approved - Journal No: 63975 \| Link: https://www.ugc.ac.in/journallist/subjectwisejurnallist.aspx?tid=MjM0OTUxNjI=&&did=U2VhcmNoIGJ5IEITU04= |
| Registration ID | : JETIR 228306 |
| Paper ID | : JETIRDK06104 |
| Title of Paper | : Bhartiya Samajatil Shikshanamadhil Lingbhedbhav |
| Impact Factor | : 5.87 (Calculate by Google Scholar) |
| Licence | : UGC,ISSN,DOI and Creative Common Approved |
| DOI | : |
| Published in | : Volume 7 \| Issue 2 \| 2020-02-21 |
| Publication Date: | 2020-02-21 |
| Page No | : 318-320 |
| Published URL | : http://www.jetir.org/view?paper=JETIRDK06104 |
| Authors | : Dr. Tatyaram Sondge |

Thank you very much for publishing your article in JETIR. We would appreciate if you continue your support and keep sharing your knowledge by writing for our journal JETIR.

Editor In Chief
International Journal of Emerging Technologies and Innovative Research
(ISSN: 2349-5162)



Scanned with OKEN Scanner

19.20

# INDEX


01) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी साहित्यातील योगदान
**प्रो. डॉ. मधुकर दगडुदेव क्षीरसागर, बीड** ||17

02) महात्मा फुलेंचे स्त्रीवादी क्रांतीकारी विचार
**प्रा.डॉ. अशोक गंगाराम साबणे, नांदेड** ||20

03) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्म चिकित्सा
**प्रा. डॉ. गायकवाड अप्पाराव, उस्मानाबाद, प्रा. डॉ. आदमाने भाऊसाहेब, लातूर** ||23

04) राज्यघटनेतील मुलभूत अधिकार : एक अभ्यास
**प्रा. कावळे एस. टी., बीड** ||27

05) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
**प्रा.नारायण सोपान लोखंडे, पंढरपूर** ||30

06) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री मुक्तीच्या कार्यातील योगदान
**डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर, बीड** ||33

07) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारधन व दृष्टिकोन
**प्रा.डॉ. भास्कर वि. नरवाडे, अहमदपूर** ||35

08) महात्मा जोतिबा फुले यांचे शेतीविषयक विचार
**प्रा. जाधवर शशिकांत श्रीरंग, कळंब** ||38

09) महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज
**डॉ. मुंडे महादेव रावसाहेब, बीड** ||41

10) राजर्षी शाहू महाराजांची स्त्री शिक्षण विषयक भुमिका
**डॉ. बी. जी. माने, उस्मानाबाद** ||44

11) छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक धोरण
**शिवकुमार केशवराव पांचाळ, नांदेड** ||46


Shri. Siddheshwar Mahavidyalaya Dist Beed-431131(MH)

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

06

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री मुक्तीच्या कार्यातील योगदान

**डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
श्री. सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगांव, ता. माजलगांव जि. बीड.

**प्रस्तावना :**

भारतीय पारंपारिक समाजत स्त्रीला आदिशक्ती, लक्ष्मी, सरस्वती, शारदा, दुर्गा, रणचंडी, महिषासुर मर्दिनी यासारख्या दैवी शक्तीच्या रूपात पुजले जात असले तरी भारतीय समाज जीवनातील पारंपारिक श्रमविभाजनाच्या तत्वाचा विचार करता असे आढळते की, 'चूल व मूल' हे स्त्रीचे कार्यक्षेत्र व घराबाहेरची कामे पुरूषाकडे (Women for Hearth and Man for the field) हे श्रमविभाजनाचे सूत्र होते, म्हणजेच एक प्रकारे लिंगाधिष्ठीत सुप्त स्तरीकरण व्यवस्था जातीसदृश्य होती. जिने लिंगभेदाच्या आधारे स्त्रीला अर्पित कनिष्ठ दर्जा दिला व सामाजिक गतिमत्व नाकारले. 'यत्र नार्यस्तु पुज्यते रमन्ते तत्र देवता' याकडे दुर्लक्ष करून 'न स्त्री-स्वातंत्र्यम अर्हती' यावर भर देऊन स्त्रीला गौण लेखण्याचा प्रकार शेकडो वर्षापासून भारतीय समाजात जसा झाला तसाच स्त्री कशी गौण आहे याचा सिध्दांत पाश्चिमात्य समाजात निर्माण झाला. स्त्रीचा मेंदुच पुरूषाच्या मेंदुपेक्षा लहान आहे. म्हणून तिची बुध्दीमत्ता कमी व बुध्दीमत्ता कमी म्हणुन तिला गौण स्थान असणे स्वाभाविक आहे, असे त्याचे समर्थन दिले गेले. स्त्री कितीही हुशार, व्यवहार चतुर, कृर्तत्वान असली तरी तिला गुलाम तथा शुद्राप्रमाणेच ज्ञानाचा, मताचा अधिकार नाकारला गेला व ज्ञानापासून स्त्रियांना वंचित ठेवून त्यांनी केवळ प्रजोत्पादन व भरणपोषणाचे काम करीत राहावे अशी व्यवस्था उभी करून स्त्रीला गौण लेखण्याचा प्रकार वर्षानुवर्षे होत राहिला अर्थात या विचाराला आधुनिक काळात विशेषतः १९ व्या शतकात विचारवंत तथा उदारमतवाद्यांनी आव्हान दिले. ज्यामध्ये प्रामुख्याने मेरी वोल्स्टन क्राप्ट, जॉन स्टुअर्ट मिल, हफरीयट टेलर, एमिली डेव्हीस, फ्रान्सिस पॉवर कॉब, जोसेफाईन बटलर यांचा सामावेश होतो. कारण या उदारमतवादी लेखकांनी पुरूषाप्रमाणेच महिला विवेकी व विचारक्षम आहेत असे मत मांडले. शोषितांसाठी ज्याप्रमाणे थॉमस पेन यांचा 'Right to Man' हा ग्रंथ महत्वाच्या ठरला. त्याचप्रमाणे 'Hindication of the rights of Women' हा मेरी वोल्स्टन क्राप्टचा ग्रंथ स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीने महत्वाचा ठरला. त्याचप्रमाणे जॉन स्टुअर्ट मिल यांचे 'The Subjection of Women' हे पुस्तक स्त्री स्वातंत्र्याच्या विचारात भर घालणारे ठरले. उदारमतवादाने सार्वजनिक हक्कांसाठी झगडून शिक्षण, मताधिकार, संपत्तीचा अधिकार व स्त्री-पुरूष समतेचा आग्रह धरला. या उदारमतवादाचा प्रभाव तिसऱ्या जगातील विविध चळवळीवर पडला. यातुनच भारतासारख्या परंपरावादी देशात ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यासारख्या संघटनांनी उदारमतवादी विचार स्त्रीवादी विचारात मांडला आहे. न्या. रानडे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी सार्वजनिक जीवनात संघर्ष करून शिक्षण, मत, संपत्ती इत्यादींचा अधिकार आणि स्त्री-पुरूष समतेचा ज्याप्रमाणे आग्रह धरला. त्याचप्रमाणे सईद अहमद खान, सर बद्रोध्नि तैय्यबजी यासारख्या मुसलमान समाज सुधारकांनी सुध्दा स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून स्त्रियांना शिक्षण देण्याचा विचार मांडला. या सामाजिक सुधारणा चळवळीतूनच स्त्री मुक्तीच्या कार्याला गती प्राप्त झाली.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये :**

शोधनिबंधाकरीता विषयाची निवड करत असतांना त्यांची आवश्यकता व महत्व लक्षात घेणे गरजेचे असते प्रस्तुत शोधनिबंध ही त्यास अपवाद नाही. भारतातील अनेक सुजासुधारकांनी स्त्री मुक्तीच्या, स्वातंत्र्याच्या कार्यासाठी आपले आयुष्य वेचले हे जरी सत्य असले तरी वेळेची आणि विषय स्तराची मर्यादा लक्षात घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाकरिता जे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले ते असे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महिला विषयक दृष्टीकोन आणि स्त्री मुक्तीच्या कार्यातील योगदान जाणून घेणे हा होय.

**गृहितके :**

भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रियांच्या दयनीय व गुलामगिरीच्या अवस्थेस वैदिक काळातील धर्मग्रंथ आणि प्रथा परंपरा जबाबदार असून त्याच्या जोखडातून मुक्तता हिच स्त्रीची मुक्ती असून त्या मुक्तीचा मार्ग शिक्षण रूपी ज्ञान मंदिरातून जातो.

रशियन विचारवंत प्लेकनॉव्ह यांनी The Role of Individual in History या आपल्या शोध प्रबंधात म्हटल्याप्रमाणे, "जे पुरूष आपल्या कालखंडातील सुधारणा संबंधीच्या समस्या मांडून त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात, तेच इतिहास घडवतात व असे इतिहास घडविणारे महापुरूष आपल्या कालखंडाच्या पुढील काळात डोकावून पाहतात व आपल्या काळातील समस्या सोडवण्यासाठी झगडत असतात. याकामी त्यांची इच्छाशक्ती व कळवळाही इतरांपेक्षा प्रबळ असते. कारण मानवतेच्या सेवेची प्रेरणा झंझावताप्रमाणे त्यांच्या आयुष्यात वाहात असते असे जे महापुरूष मानवतेचे पुजारी भारतभूमीमध्ये जन्मास आले. त्यामध्ये फुले-शाहू-आंबेडकर ही खऱ्या अर्थाने 'पवित्र त्रयी' आहेत. या महापुरूषांचे सामाजिक विचार आणि कार्य हा एक सामाजिकदृष्ट्या अखंड प्रवाह आहे."



Scanned with OKEN Scanner

शेकडो वर्षापासून आज्ञानाने काळवंडून गेलेल्या व दारिद्र्याने गांजलेल्या बहुजन-दीन-दलित समाजाच्या उध्दारासाठी समाजपरिवर्तनाची प्रचंड उर्मी घेऊन मागासलेल्या समाजाचा उध्दार करण्याचे कार्य केले. तत्कालिन समाजातील 'स्त्री वर्ग' हा ही एकप्रकारे उपेक्षित व सर्वार्थाने मागासलेला होत. पुरूषप्रधान पितृसत्ताक समाज असणाऱ्या संस्कृतीत स्त्रियांवर अनेक अन्याय-अत्याचार होत होते. बालविवाह, विधवा विवाहास प्रतिबंध, पडदा पध्दती, शिक्षण बंदी यासारख्या बाबींमुळे स्त्रियांचे जीवन असहाय्य व परावलंबी बनले होते. अशा स्थितीत स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य म. फुले पासून ते आंबेडकरांपर्यंत अनेक समाजसुधारकांनी केले. विशेषत: म. फुलेंनी स्त्री शिक्षणाची सुरू केलेली चळवळ ही खऱ्या अर्थाने स्त्री-मुक्तीची चळवळ ठरली. फुले यांच्या समाजसेवेच्या कार्याला अधिक कृतिशील, समृध्द करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाहीचे पुरस्कर्ते मानवी स्वातंत्र्याचे कैवारी थोर मानवतावादी स्त्री-स्वातंत्र्याचे प्रेणेते आणि समताधिष्ठीत समाज रचनेचे पुरस्कर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील योगदान महत्वपूर्ण राहिलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ दलितांचे उध्दारक इतकेच मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो हे योग्य नाही. कारण केवळ दलितच नव्हे तर समस्त बहुजन समाज आणि त्याची परिस्थिती दलितांसारखीच होती. किंबहुना दलिताहून अधिक बिकट तथा माघारलेली होती. अशा समस्त स्त्री जातीच्या उध्दारांचे जे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. हिंदू संस्कृतीत आणि समाज व्यवस्थेत उत्तर वैदिक कालखंडापासून स्त्रियांच्या दर्जात आणि स्थानात घसरण घडून आली. त्यांना दुय्यम दर्जा दिला गेला. सामाजिक, राजकीय, आर्थिक अधिकार नाकारण्यात आले. अनिष्ठ प्रथा -परंपरांच्या बंधनांनी जोखडून टाकण्यात आले. अनिष्ठ प्रथा-परंपरा आणि बंधने जुगारून स्त्रियांनाही समान हक्क, अधिकार आणि वागणुक मिळावी त्यांना योग्य सन्मान मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्काला, समतेला आणि मुक्तीला कायद्याचे रूप दिले. 'एक व्यक्ती एक मत' एवढ्यापुरताच त्यांनी स्त्री-पुरूष समतेचा पुरस्कार केला नाही. तर 'एक व्यक्ती एक मूल्य' असे नवे क्रांतीसूत्र त्यांनी देशातील स्त्रियांसह सर्व शोषितांच्या हातात दिले. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांच्या भोवती संरक्षणाचे एक कवच उभे केले. घटनेच्या चौदाव्या कलमाने सर्व व्यक्तींना कायदेशीर समानता बहाल करून महिलांना सामाजिक, सार्वजनिक जीवनात समान दर्जा व संधी देणारा समतेचा मुलभूत अधिकार दिला. पंधराव्या कलमानुसार स्त्री-पुरूष भेद घटनात्मकरित्या नष्ट करून महिलांच्या हिताची जोपासना करण्याकरीता विशेष तरतुद करण्याचा अधिकार शासनास देण्यात आला आहे. परिणामी भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच येथील स्त्रियांनाही स्वातंत्र्य मिळून त्यांची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्तता झाली.

आज अनेक स्त्रियांना याची कल्पनाही नसेल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता तो केवळ स्त्रियांच्या हक्कासाठी दिला होता. त्या राजीनाम्याचे तत्कालिन कारंजे ठरले ते 'हिंदु कोड बिल' हेच होय. स्त्रियांना १९५४ पूर्वी मालमत्ता ग्रहण करणे, पतीपासून विभक्त होवून घटस्फोट घेणे, स्त्री दत्तक म्हणून घेतली जात नव्हती किंवा स्त्रीला मुल दत्तक घेता येत नव्हते, पतीच्या व पित्याच्या मलमत्तेत तिला अधिकार नव्हता ही स्त्रियांच्या वाट्याला आलेली असमानता संपविण्यासाठी त्यांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले. परंतु हे बिल संसदेत पास होणार नाही हे लक्षात येताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला. जरी हिंदू कोड बिल तत्कालिन संसदेत पास होवू शकले नाही तरी बाबासाहेबांचे कष्ट आणि प्रयत्न निरर्थक गेले असे नाही. तर पुढे हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चारही कायदे पंडित नेहरू सरकारने मंजूर करून घेतले ते कायदे असे की, १) हिंदू विवाह कायदा २) हिंदू वारसा कायदा ३) हिंदू अज्ञान पालकत्व कायदा ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा यासारख्या कायद्याच्या रूपाने एकप्रकारे पुढील काळात हिंदू कोड बिलच पास झाले. त्यामुळे स्त्रियांना कौटुंबिक वैवाहिक जीवनात जे अधिकार प्राप्त झाले. त्यामुळे अनेक प्रथा आणि परंपरांनी नाकारलेले अधिकार आणि हक्क स्त्रियांना प्राप्त होवून एकप्रकारे कुप्रथा आणि परंपरातून स्त्रियांची मुक्तता झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणत असत की, कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समजातील स्त्रियांच्या स्थानावरून, प्रगतीवरून करता येते. भारतीय स्त्री ही समाजाची आधारशिला आहे. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे समान हक्क, समान न्याय व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. स्त्रियांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे सांगत असत की, आपली पुढची पिढी जर सुधारावयाची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण द्या. शिवाय डॉ. बाबासाहेबांच्या पक्ष संघटनेचे जे कार्यक्रम होत असत. त्या कार्यक्रमाला पुरूष कार्यकर्ता घरातील महिलेला सोबत घेवून आल्याशिवाय त्यांना पक्षसंघटनेच्या कार्यक्रमात प्रवेश न देण्याचा बाबासाहेबांनी पक्ष संघटनेचा नियमच बनवला होता. कारण बाबासाहेबांचा असा दृढ विश्वास होता की, स्त्रियांच्या सहभागाशिवाय समाज परिवर्तनाची चळवळ यशस्वी होवू शकत नाही. स्त्रियांनी राजकारणात प्रवेश करावा, त्यांनी राजकारणातील निर्णय स्वत:च घ्यावेत. पुरूषांच्या हातचे भावले बनू नये. यासाठी त्यांनी पक्ष संघटनेत ज्या तरतुदी केल्या होत्या त्यामागील त्यांची दूरदृष्टी आणि स्त्री विषयक त्यांचा दृष्टीकोन किती व्यापक होता याची जाणीव होते.



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication
February 2020
Special Issue-04


Shri. Siddheshwar Mahavidyalaya Dist.Beed-431131(MH)

07

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारधन व दृष्टिकोन

**प्रा.डॉ. भास्कर वि. नरवाडे**
मराठी विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

6. Kulkarni SS, Bodkhe GA, Sayyad PW, S. S. Hussaini SS and Shirsat MD. Electrochemical Impedance Spectroscopic Study Of Dye Sensitized Solar Cell With Al Doped $TiO_2$ Nanoparticles Photo Anode Sensitized By Eosin Y Dye. International Journal of Advance and Innovative Research 2018; 6(1): 111-116
7. Shanting Zhang, Thesis, 2017, Study of fluorine-doped tin oxide (FTO) thin films for photovoltaics applications, Materials, Université Grenoble Alpes, English. <NNT: 2017GREAI021>. <tel-01689976>
8. Geetam Richhariyaa, Anil Kumara, Perapong Tekasakul, Bhupendra Gupta. Natural dyes for dye sensitized solar cell: A

review, Renewable and Sustainable Energy Reviews 2017; 69: 705–718.

9. Giuseppe Calogero, Antonino Bartolotta, Gaetano Di Marco, Aldo Di Carlo and Francesco Bonaccorso. Vegetable-based dye-sensitized solar cells. Chem. Soc. Rev. 2015; 44, 3244-3494, Doi. Org/10.1039/c4cs00309h
10. Fan Zhang, Feng Shi, Wei Ma, Fei Gao, Yang Jiao, Hui Li, Jingchuan Wang, Xinyan Shan, Xinghua Lu, and Sheng Meng. Controlling Adsorption Structure of Eosin Y Dye on Nanocrystalline TiO2 Films for Improved Photovoltaic Performances. J. Phys. Chem. C 2013; 117: 14659-14666, dx.doi.org/10.1021/jp404439p
11. Rhee SW and Kwon W. Key Technological Elements in Dye sensitized Solar Cells. Korean J. Chem. Eng. 2011; 28: 1481
12. Sang Hern Kim and Chang Woo Park. Novel Application of Platinum Ink for Counter Electrode Preparation in Dye Sensitized Solar Cells. Bull. Korean Chem. Soc. 2013; 34( 3): 831-836
13. M. Gratzel . Dye Sensitized Solar Cells. Journal of Photochemistry and Photobiology C: Photochemistry Reviews 2003; 4(2):145–153
14. Souad A. M. Al-Bat'hi, Iraj Alaei, Iis Sopyan. Natural Photosensitizers for Dye Sensitized Solar Cells. International Journal Of Renewable Energy Research 2013; 3(1): 138-143
15. Halil İbrahim Yavuz, Thesis, (2014), Design Of High-Efficiency Dye-Sensitized Nanocrystalline Solar Cells, Middle East Technical University, turkey
16. M. Kouhnavard, N. Ahmad Ludin, B. Vazifehkhah Ghaffari, K. Sopian, N. Abdul Karim, and M. Miyake. An efficient metal-free hydrophilic carbon as a counter electrode for dye sensitized solar cells. International Journal of Photoenergy 2016; 2016, Article ID5186762, 7 pages,.
17. Zhang Y, Wu W, Zhang K, Liu C, Yu A, Peng M and Zhai J. Raman Study of 2D Anatase $TiO_2$ Nanosheets. Phys. Chem. Chem. Phys. 2016; 18(47): 32178-32184, DOI: 10.1039/C6CP05496J



19-20

Dr. Patil



IMPACT FACTOR 5.80

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue : XVIII, Vol. - I**
**Year - IX, (Half Yearly)**
**Aug. 2019 To Jan. 2020**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (**Mob. 09423346913**)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Issue : XVIII, Vol. I
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. Ankush L. More** | 1 |
| 2 | Women and Space: A Study of Africa as Depicted by African Women Writers<br>**Puja Sarmah** | 10 |
| 3 | पत्रकारिता : जिम्मेदारी एवं चुनौतियाँ<br>**डॉ. आलीया मेराज सय्यद** | 15 |
| 4 | इसीस आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>**डॉ. सुभान तुळशीराम जाधव** | 18 |
| 5 | दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार<br>**डॉ. आर. डी. जाधव** | 26 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही<br>**डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे** | 31 |
| 7 | आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन<br>**डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | 36 |
| 8 | भ्रष्टाचार मुक्तिच्या दृष्टिकोनातून संत तुकारामाच्या अभंगाची उपयुक्तता<br>**रामचंद्र ना. पस्तापुरे** | 43 |
| 9 | 'यज्ञकुंड' मधील सामाजिक जाणीव<br>**डॉ. उन्मेश शेकडे** | 46 |
| 10 | ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारीचे निवारण<br>**डॉ सुनील एच. पाटील** | 50 |
| 11 | जम्मू-काश्मीर : एक विवादित प्रश्न<br>**डॉ. के.जी. कुंभारकर** | 55 |

Shri Siddheshwar Mahavidyalaya (MIDC) Majalgaon Dist.Beed 431131(MS)

Issue - XVIII, Vol. I
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020
50

10

# ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारीचे निवारण

**डॉ सुनील एच. पाटील**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय
माजलगाव जि. बीड

**Research Paper - Public Administration**

ABSTRACT

*केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या राष्ट्रीय ई-प्रशासन विभागाच्या अंदाजानुसार, विविध केंद्रीय मंत्रालये आणि राज्य सरकारांना सुमारे ३५०० हून अधिक ई-सेवा देऊ करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय माहिती केंद्राच्या अंदाजानुसार, विविध मंत्रालये आणि राज्य सकारांची सुमारे ८००० हून अधिक पोर्टल आणि संकेतस्थळे (वेबसाईट) केंद्रामार्फत चालवली जातात.*

**प्रस्तावना :**

नवभारत २०२२ ही संकल्पना रुडवताना किमान शासन कमाल प्रशासन हा त्याचा प्रमुख पैलू आहे आमि सार्वजनिक तक्रार निवारण ही त्याची आधारशीला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भारतात गेल्या काही वर्षात ई-प्रशासन राबवताना विलक्षण आणि अत्यंत प्रगत अशा माध्यमाद्वारे विकासाचे जे अनेक उपक्रम हाती घेण्यात आहेत, त्याच्याशी किमान शासन, कमाल प्रशासन या संकल्पनेचा निकटचा संबंध आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे अनेक सार्वजनिक सेवा ऑनलाईन पध्दतीने पुरविणे शक्य झाले आहे. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या राष्ट्रीय ई-प्रशासन विभागाच्या अंदाजानुसार विविध केंद्रीय मंत्रालये आणि राज्य सरकारांना सुमारे ३५०० हून अधिक ई-सेवा देऊ करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय माहिती केंद्राच्या अंदाजानुसार विविध मंत्रालये आणि राज्य सराकरांची सुमारे ८००० हून अधिक पोर्टल आणि संकेतस्थळे (वेबसाईट) केंद्रामार्फत चालवली जातात.

**१) केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली :**

केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांच्या सार्वजनिक तक्रारींबाबत मुख्य धोरण आखणे, देखरेख आणि समन्वयाचे काम प्रशासकीय सुधारमा आणि सार्वजनिक तक्रारी विभागामार्फत केले जाते. या विभागामार्फत सेवोत्तम ही पध्दत विकसित करण्यात आली. सेवोत्तम याचाच अर्थ सार्वजनिक सेवेबाबतची उत्कष्टता! या योजनेअंतर्गत प्रत्येक सरकारी विभागांकडे आपला प्रभाग कोणत्या मुख्य सेवा पुरवते त्याची रुपरेषा या सेवांची मानके आणि कालबध्दता, सार्वजनिक तक्रार निवारण यंत्रणा आणि सार्वजनिक सेवांचे वितरण, मानकांचे मूल्यमापन आणि सुधारणा याची प्रणाली या सर्व बाबींची माहिती देणारी नागरिकांची सनद असमे आवश्यक असते, याशिवाय, ग्राहक प्रतिसाद (फिडबॅक), कर्मचारी प्रेरणा आणि पायाभूत सुविधा या सेवा वितरण पध्दत सक्षम करणाज्या बाबींवर या विभागांनी भर देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजविक तक्रारी विभागाने "केंद्रीय सार्वजिक तक्रार निवारण आणि देखरेख प्रणाली" २००७ पासून सुरु केली आहे. केंद्र सरकारने पुढाकार घेऊन या प्रमुख उपक्रमाची निर्मिती केली आहे. केंद्र सरकारने पुढाकार घेऊन या प्रमुख उपक्रमाची निर्मिती केली आहे. यामध्ये सार्वजनिक तक्रारींची दखल घेणे यावर देखरेख ठेवणे आणि हे करत असताना ही कामकाजाची पध्दत केंद्रीकृत, पारदर्शक, जबाबदार, विश्वासार्ह आणि कार्यक्षम असणे आवश्यक आहे. हिंदी भाषेत ही प्रणाली उपलब्ध आहे. देशातील नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ही प्रणाली तेथील प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. यामध्ये हरयाणा, ओडिसा, मिझोराम, राजस्थान, मेघालय, पुडुचेरी, उत्तराखंड, झारखंड आणि मणिपूर यांचा समावेश आहे. या तक्रारींवर प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाकडे आलेल्या तक्रारी संबंधित मंत्रालये/विभागांकडे पाठवल्या जातात. या तक्रारीचे निवारण संबंधित मंत्रालय किंवा विभागाकडून विकेंद्रीत पध्दतीने केले जाते.

**२) सार्वजनिक सेवा वितरण कायदा :**

केंद्रसरकारने, वस्तू आणि सेवांचे कालबध्द रितीने वितरण होणे आणि तक्रारींचेही वेळेत निवारण होणे हा नागरिकांचा हक्क आहे. अशा स्वरुपाचे एक विधेयक-२०११, डिसेंबर २०११ साली लोकसभेत मांडण्यात आले. वस्तू आणि सेवांचे कालबध्द रितीने वितरण होणे हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आहे. नागरिकांची सनद प्रकाशित करणे अनिवार्य आहे. नागरिकांच्या सनदेचे अनुपालन न करणाज्यांच्या विरोधात तक्रार निवारण यंत्रणा, कामात हलगर्जीपणा दाखवणाज्या अधिकाज्यावर दंडात्मक कारवाई आणि अर्जदाराला तेवढ्याच रक्कमेचे नुकसान भरपाई, अशा अनेक प्रकारच्या तरतूदी या विधेयकात प्रस्तावित होत्या. मात्र १५ वी लोकसभा विसर्जित झाल्याने हे विधेयक रद्द करण्यात आले.

**३) नवीन प्रणाली - उमंग :**

ई-प्रशासनात मोबाईल फोनचे महत्त्व वाढत असल्याने सरकारने नुकतेच युनिफाईड मोबाईल ॲप्लिकेशन फॉर न्यू - एज गव्हर्नन्स याची इंग्रजी अद्याक्षरे घेऊन "उमंग" हे नाव तयार केले म्हणजे उमंग हे ॲप्लिकेशन सुरु केले. नव्या काळातील प्रशासनासाठी उपयोगी ठरेल असे हे मोबाईलवर वापरता येईल असे ॲप्लिकेशन आहे. इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी उमंग हे ॲप विकसित केले आहे. देशभरातील सर्व भारतीय नागरिकांना, उमंग एक समान व्यासपीठ पुरविते. यामध्ये केंद्र सरकारपासून ते स्थानिक सरकारी संस्था आणि इतर नागरिक केंद्रीत सेवा, ई-सरकारी सेवा माध्यमातून लोकांना उपलब्ध होतात. केंद्र आणि राज्य सरकारांचे विविध विभाग स्थानिक संस्था आणि खाजगी संस्थांकडून गेण्यात येणाऱ्या इतर उपयुक्त सेवा उमंग या ॲपद्वारे पुरवल्या जातात.

यामध्ये एकसंध पध्दत वापरम्यात आली असून नागरिकांना एकच अनुप्रयोग (ॲप्लिकेशन) वापरून बहुविध सरकारी सेवांचा लाभ घेता येतो. स्मार्टफोन, टॅब्लेट आणि डेस्कटॉप या सर्व माध्यमाद्वारे हे ॲप्लिकेशन वापरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**४) ई-ताल वेह पोर्टल (e-Taal Web Portal) :**

इ-प्रशासन प्रकल्पामधील इलेक्ट्रॉनिक व्यवहारांचा प्रसार करण्यासाठी इ-ताल हे वेब पोर्टल सुरु करण्यात आले. केवळ २०१७ या एका कॅलेंडर वर्षात या पोर्टलच्या मदतीने ३५०० सेवांच्याद्वारे ३० अब्जपेक्षा जास्त व्यवहार करण्यात आले. या वर्षात दर दिवशी सुमारे ८२ दशलक्षापेक्षा जास्त व्यवहार झाले. हे प्रमाण २०१३ मध्ये दर दिवशी केवळ ६.५ दशलक्ष इतके होते.

वर्तमान काळात मोबाईल फोन, स्मार्ट फोन आणि व्हॉटसॲप सारख्या ॲप्लिकेशनचा देशाच्या दूर्गम भागातही मोठ्या प्रमणावर होत असलेला स्वीकार आणि वापर बघता येत्या काही वर्षातच जिथे मानवी हस्तक्षेप करावा लागतो अशी क्वचितच एखादी सेवा राहील. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे हे भविष्यातील चित्र नक्कीच आशादायक आहे.

**५) माय जीओव्ही (My Gov) एक सरकारी उपक्रम :**

माय जीओव्ही डॉट इन (My gov.in) हा एक अनन्यसाधारण आणि महत्त्वाचा असा सरकारी उपक्रम आहे. पंतप्रधानांनी २०१४ मध्ये हा उपक्रम सुरु केला. सामान्य नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग हे याचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये ठरले आहे. माहितीचा प्रसार करणे आणि जनमत आजमावणे, हा या व्यासपीठाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. देशातील प्रशासन प्रक्रियेमध्ये नागरिकांना आवाज देण्याचे काम या संकेतस्थळाने केले आहे. देशाचे नागरिक या नात्याने ते या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतात. तसेच स्वतःचा कृतीशील सहभाग नोंदवून ते सरकारी उपक्रमांची अंमलबजावणीही करू शकतात. अंदाजे १० लाख ७८ हजार माय जीओव्ही संकेतस्थळाचा

वापर करत आहेत. यातील उपक्रमांत आपले योगदान देत आहेत.

**६) इतर नागरिक केंद्री सेवा :**

अनेक राज्य सरकारमार्फत नागरिकांच्या तक्रारी नोंदवून घेण्यासाठी ऑनलाईन व्यासपीठाचा वापर करत आहेत. ही खरेच आनंददायी बाब आहे. अशाच काही उपक्रमांपैकी उत्तरप्रदगेशातील लोकवाणी या प्रकल्पाची दखल घेणे इथे महत्त्वाचे ठरते. या प्रकल्पामध्ये नागरिकांना किओरक केंद्राच्या सहाय्याने सहजपणे सरकारी कामकाजासंबंधी तक्रारी नोंदवता येतात. आणि तक्रार नोंदवल्यापासून १५ दिवसांच्या आत तिचे निवारणही केले जाते. त्याच प्रमाणे इ-प्रशासनाच्या सहाय्याने तक्रार निवारण करण्यासाठी जनसुनावणी अथवा इ-संवाद पोर्टलही केवळ याच कारणासाठी निर्माण करण्यात आले आहे. आता लोकवाणीमध्ये येणाऱ्या सर्व तकारी या पोर्टलवर उपलब्ध होतात.

आंध्रप्रदेश सरकारनेही सरकार आणि नागरिक यांच्यात इ-दुवा निर्माण करण्यासाठी 'एपी ऑनलाईन डॉट कॉम' 'aponline.com' या राज्य सरकारच्या अतिशय सर्वसमावेशक अशा ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली आहे. ही एकात्मिक तक्रार निवारण वाहिनी आहे. यामध्ये माहिती मिळाल्या मिलाल्या त्याच्यावर लगेचच प्रक्रिया केली जाऊन प्रतिसाद दिला जातो. आंध्रप्रदेशच्या तत्काळ प्रशासन उपक्रमाचा तो एक भाग आहे. केरळमध्ये ऑनलाईन तक्रारी नोंदविण्यासाठी इ-परिहरण हे ॲप सुरु करण्यात आले. त्याच प्रमाणे एसएमएस व्हॉटसॲप, इ-मेल द्वारेही तक्रारी नोंदविता येऊ लागल्या.

सार्वजनिक तक्रारी म्हटले की, त्या केवळ सरकारी विभागाशीच संबंधित असतात असे नाही. नागरिकांना इतरही अनेक तक्रारी असू शकतात. उदा.एखादी वस्तू खरेदी करतात किंवा एखादी सेवा वापरतात त्याबाबतची तक्रार असल्यास ती बाब ग्राहक संरक्षणाअंतर्गत येते. सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाने एकात्मिक तक्रार निवारण यंत्रणा हे पोर्टल सुरू केले आहे.

**७) भविष्यातील दृष्टिकोन :**

सार्वजनिक सेवा आणि तक्रार निवारण याबाबतची भविष्यातील वाटचाल कशी असेल याचा विचार करायचा झाला तर त्यासाठी काही मुलभूत तत्वांची परिपूर्ती करणे आवश्यक आहे. लोकांना सेवा पुरवताना त्याचा चेहरा विरहित म्हणजे व्यवहार करताना प्रत्यक्ष व्यक्तिशी तो केला जाऊ नये. रोख पैशामध्ये व्यवाह नसावा आणि कागद विहरीत म्हणजे कागदपत्रांचा फाफटपसारा नको, अशा स्वरुपाच्या असणे आवश्यक आहे. म्हणजेच हे व्यवहार डिजिटल व्हायला हवेत. यासाठी लागणारी डिजिटल जोडणी आणि डिजिटल ओळख सर्वांना पुरवणे आवश्यक आहे.

आधारमुळे अनेक फायदे जाले आहेत. लाभार्थ्यांच्या यादीतून नकली बनावट खोट्या लोकांची नावे गाळून टाकण्यात आली आणि योजनांचा लाभ खऱ्या व्यक्तींना मिळू लागला. थेट

लाभ हस्तांतरण योजने अंतर्गत (डीबीटी भारत डॉट जीओव्ही डॉट इन हे संकेतस्थळ) (dbtbharat.gov.in) स्वयंपाकाचा गॅस, अन्नधान्ये यासाठी या अगोदरच अनुदान मिळमे सुरु झाले आहे. त्याच प्रमाणे २०१७ मध्ये खतांच्या अनुदानासाठी एक वेगळ्या प्रकारचे लाभार्थी प्रतिमान (मॉडेल) राबवण्यात आले.

**निष्कर्ष :**

ग्राहक तक्रारींचा विचार करता त्यांचे निवारण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान साधने अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनवण्याच्या दृष्टीने आपल्याला अजून बरीच वाटचाल करायची आहे. माहितीचा झपाट्याने होत असलेला प्रसार बघता नागरिक आता स्वतःच्या अधिकारांबाबत आगि संधीबाबत जागरुक होऊ लागले आहेत. अशा वेली तक्रार निवारणासाठी 'जागो ग्राहक जागो' सारखे उपक्रम महत्त्वाचे ठरतात. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता, नवा भारत २०२२ याबाबतची धोरणात्मक योजना बनवताना सार्वजिक तक्रार निवारणासाठी इ-प्रशासन कार्यपध्दती वापरणे गरजेचे आहे. या पध्दतीमध्ये प्रगत, अद्ययावत आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश असावा. इ-प्रशासनाबाबत लोकांमध्ये जागरुकता निर्माण करून याविषयी च्या माहितीचा प्रसार करून सार्वजनिक तक्रार निवारण पध्दत बळकट करून आणि नागरिकांच्या अधिकारांचे जतन करून जगापुढे भारताने एक आदर्श उदाहरण ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रराष्ट्रातील सलोखा मजबूत होण्यास मदत होईल.

## संदर्भ सूची :-

१) Economic Times, December ८, २०१८
२) Yojana - Public Grievance Redressal, February २०१८.
३) हिंदी विवेक वर्ष ७ वे अंक ५, नवम्बर २०१६.
४) हिंदी विवेक ग्रामोद्य दिपावली विशेषांक नवम्बर २०१६.
५) कुरुक्षेत्र ग्रामीण विकास को समर्पित दिसम्बर २०१५.
६) यशदा यशमंथन जानेवारी - मार्च २०१८.
७) योजना विकास समर्पित मासिक २०१८.



19-20

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयार्तंगत राष्ट्रीय चर्चासत्र



# वैचारिक मराठी साहित्य :

## शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक

डॉ.देविदास खोडेवाड

39) तृतीय रत्न नाटकातील अधोरेखित शिक्षण महत्व
**डॉ.गणेश मदनराव शिंदे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, औरंगाबाद.** ||132

40) मराठी संत साहित्याची परंपरा व स्वरूप
**प्रा.डॉ.दिलीप रामचंद्र जाधव, नांदेड** ||135

41) म.ज्योतिबा फुले थोर प्रबोधनकार
**प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ, बीड** ||137

42) उपेक्षितांचे कैवारी : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
**डॉ. संभाजी पाटील, लातूर** ||141

43) सत्यशोधक रा.ना. चव्हाण यांच्या लेखनातील मूल्यात्मकता
**डॉ. संभाजी पाटील, लातूर** ||143

44) परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय: संत गाडगेबाबा
**प्रा.डॉ.गायकवाड यशवंत जंगलू,उस्मानाबाद** ||146

45) भटक्या – विमुक्तांची वैचारिक साहित्य चळवळ
**प्रा.डॉ.दिलीप ज्ञा.भिसे,बीड** ||151

46) प्रबोधन व परिवर्तन कालीन चळवळीत दलित नाटकाची भूमिका
**अरुणा मानिक गायकवाड.औरंगाबाद.** ||153

47) म.फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री चळवळीतील योगदान
**डॉ. सारिका अशोकराव बुरगे, बीड** ||155

48) यशवंतराव चव्हाणांच्या वैचारिक साहित्यातून अभिव्यक्त झालेले आर्थिक विचार
**प्रा.डॉ.सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते, बुलढाणा.** ||158

49) परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय :- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले
**प्रा.डॉ. गायकवाड यशवंत जंगलू, उस्मानाबाद** ||164

50) आधुनिक विदर्भातील संताचे समाजप्रबोधन : संत गाडगेबाबा
**डॉ. मंजुषा वि.भटकर, नांदेड** ||168

51) गुन्हेगारी जाती–जमातींच्या वैचारिक लेखनाचे स्वरूप
**एम.के.शिंदे, औरंगाबाद.** ||170

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

४) संतांनी आपले विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कीर्तन, प्रवचने दिली आणि भाष्य ग्रंथ लिहिले. तसेच अभंगही रचले. म्हणून संत साहित्यात समानतेची, करूणेची भावना समाजापर्यंत पोहोचविण्याची उत्कट प्रेरणा दिली.

५) संस्कृत भाषेच्या तुलनेत देशी भाषेचे सामर्थ्य, सौंदर्य सिद्ध करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले आणि समाजहिताच्या व्यापक दृष्टिकोनातून वाङ्मय निर्मितीचा आपला हेतू साध्य केला.

६) जीवन जगत असताना माणूस चांगले-वाईट असे दोन्ही कर्म करतो मात्र त्याला लक्ष्मणरेषा साधण्याचे काम संत साहित्य करते.

७) संत साहित्य लौकिक विचार करून थांबत नाही तर माणसावर संस्कार होण्यासाठी साहित्याचा उपयोग होतो.

८) भारत हा आध्यात्म देश असल्याने संत साहित्याबद्दल अनेक अंगाने विचार करावा लागेल.

९) संतांचे विचार अंधश्रद्धेकडे घेऊन जाणारे आहेत म्हणणे दुर्दैवी आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) प्राचीन वाङ्मयाचा इतिहास - प्रा.जीवन पिंपळवाडकर, प्रा.भूजंग वाडीकर

२) प्राचीन वाङ्मयाचा इतिहास - ल.रा.नसिराबादकर

३) प्राचीन वाङ्मयाचा इतिहास - प्रा.वसंत बिरादार

४) संत साहित्य - डॉ.पवन मांडवकर

५) अक्षरगाथा - संपा.मा.मा. जाधव

❑❑❑

41

# म.ज्योतिबा फुले थोर प्रबोधनकार

**प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ**
श्री.सिध्देश्वर महाविद्यालय,
माजलगाव जि.बीड

**********

म.ज्योतिबा फुलेंच्या विचार परंपरेने व कार्यकतृत्वाने जो सामाजिक परिवर्तनाचा नवीन प्रवाह घडला, तो प्रवाह जातीभेद, वर्णभेद, वर्गभेद, स्त्री - पुरूष भेद उल्लंघणाज्या आत्मप्रत्ययी मानवतेने ओथंबलेला असण्याबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि लोकशाही या तत्वांच्या चिंतनातुन नवसमाज निर्मितीचे बीजारोपण करणारा होता. व्यक्तीस्वातंत्र्य व विवेकनिष्ठा यांचा आग्रह धरणाज्या आधुनिकतेने भरलेला होता. अविरतपणे जाती प्रधानता व पुरूष प्रधानतेचे शोषण व वर्चस्व नष्ट करण्यासाठी मानवमुक्तीच्या लक्ष्यामध्ये अग्रेसर होत होता.म.फुलेंनी मागे सोडलेल्या या सामाजिक संगर्षाच्या विचारपरंपरेतून एक तत्वज्ञान स्पष्टपणे अधोरेखित होते.

**शैक्षणिक कार्यातील योगदान :**

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्व पटवून देणाज्या खालील ओळी प्रसिध्द आहेत : विद्येविना मती गेली | मतीविना नीती गेली | नीतीविना गती गेली | गतीविना वित्त गेले | वित्ताविना शूद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स.१८५२ मध्ये शाळा स्थापना केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत. जोतीरावांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापकदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई. त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.

**महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार :**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म.फुले हे महापुरूष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे. या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस अशा पध्दतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म.फुलेंचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण हे सूत्र अंमलात आणावे, यावर भर देण्यात आला. आज ज्या Skill India च्या बाता आपण करतो तो विचार महात्मा फुल्यांनी जवळपास दिडशे वर्षापूर्वीच मांडला होता. ज्ञानाधारित शिक्षणासोबत कौशल्य-पूर्ण मुल्याधिष्टित शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादित औद्योगिक केले होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या शाळेत शेती व औद्योगिक शिक्षण सक्तीचे केले होते.

**महात्मा ज्योतीबा फुले यांचे शेतकऱ्यांविषयी मत :**

शेतीविषयी ज्योतिबा फुले यांनी दिलेला संदेश आज ही आपणास उपयोगी आहे. शेती आणि शेतकरी हा त्यांचा जीवनातील लिखाणाचा अविभाज्य घटक आहे. त्यांनी १०० वर्षापूर्वी पाणी अडवा - पाणी जिरवा हि संकल्पना सांगितली होती ती आज ही आपणास उपयोगी पडत आहे शतकऱ्यास त्यांच्या मालाचा योग्य फायदा मिळावा त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांचा होणारा अनावश्यक खर्च, कर्ज, काढून केलेली लग्न कार्य त्यामु होणारा त्रास, याविषयी शेतकऱ्याचा असूड या ग्रंथामध्ये अचूक भाष्य केलेलं आहे.

शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा बोजा पडलेला आहे. आपण आजच्या शेतकऱ्यांच्या अडचणी कोणत्या आहेत त्यांना काय पाहिजे ? त्यांच्यासाठी वीज, पाणी, आधुनिक तंत्रज्ञान, वाहणे तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे लागणार आहे. पूर्वीचे शेतकरी अज्ञानी होते त्यांना पुस्तकी ज्ञान नव्हते असे हतबल झालेले शेतकरी, लग्नात अतिरिक्त पैसा खर्च करतात, त्यानंतर व्हायचे तेच होते, शेतीला बीज, पाणी, बी-बियाणे वेळेवर नसल्यामुळे धान्य पिकत नाही आणि जरी पिकले तरी बाजारपेठेत त्याला किंमत नसते. म्हणून शेवटी निराश होऊन आजचा शेतकरी कर्जाला कंटाळून आत्महत्या करतात, त्या आत्महत्या का होतात ? याचा कोणत्याच सरकारने विचार केला नाही. त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी कधी समजून घेतल्या नाहीत जो शेतकरी भारत देशाला अन्न पुरवण्यासाठी दिवस - रात्र मेहनत करतो त्याचं शेतकऱ्यावर जास्त प्रमाणात शेतसारा लादला जातो, वीज महागली, बाजारपेठ शेती पासून दुर, दलालाचे वाढते प्रमाण याचा कधी विचार झालाच नाही. सरकार शेतकऱ्यावर अतिरिक्त कर लादून सरकारी कामगार / नोकरदार वर्गास मग सर्वसामान्य जनतेवर लावले जातात.

शेतकऱ्यांच्या प्रश्नाला ज्योतीबांनी हात घातला तो मोठ्या व्यापक भूमिकेत शेतकऱ्यांची परिस्थिती केविलवाणी आहे. त्यांच्या दया करा अशी भिकेची किंकाळी मारली नाही, शेतकरी कष्ठ करतो, राबतो पण त्या कष्ठाचे फळ त्यांना मिळत नाही त्यांच्याकडून ते लुबाडून घेतले जाते.

म्हणून आजची परिस्थिती पाहता सरकारने फुले - आंबेडकर यांनी जो शेतकरी व हल्लीची स्थिती त्यांच्या अडचणी त्यावर उपाय यासाठी व्यापक दृष्टीकोनाचा लोकलढा दिला याची रूजवण शासण दरबारापासून सर्व सामान्य तळागळातील शेतकरी, कष्टकरी या माणसापर्यंत गेला पाहिजे.

**महात्मा फुले यांचे शेती विकासासंबंधीचे उपाय :**

शेतीचे आधुनिकीकरण करावे, वृक्षतोड थांबवावी पावसावर अवलंबून न राहता नव्या उपकरणांचा वापर करावा, धरणे व कालवे बांधावी, दुष्काळात कर्ज द्यावे, शेतीसाठी आवश्यक पाणी देण्याची व्यवस्था सरकारने करावी आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी जास्तीत जास्त वेळ देता यावा म्हणून शेतीला पाणी देताना ते नळाद्वारे देण्यात यावे असे उपाय ते सुचवतात. इतकेच नव्हे तर रान डुकरे आणि वन्य प्राण्यापासून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना गावठी बंदुका देण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांची आजची परिस्थिती पाहता ते किती दृष्टे होते. त्यांनी त्याकाळात सांगितलेली परिस्थिती आजही जशीच्या तशी आहे, हेच जाणवते.

**सार्वजनिक सत्यधर्म :**

हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून दीनंधू हे साप्ताहिक चालविले जात असे. तुकारामाच्या अभंगांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. अभंगांच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते. आपला गुलामगिरी ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स.१८९१ मध्ये प्रकाशित झाला.

**सत्यशोधक समाज :**

२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरूवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेंव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. त्याचवेळी त्या कन्याशाळेच्या शिक्षिका म्हणूनही कार्य करीत होत्या. दिनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन प्रकाशनचे कार्य केले. महाराष्ट्रातील तळागळापर्यंत चळवळ पोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. न्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून शुद्रातिशूद्र समजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती | तयाला नकोच मध्यस्ती || हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरूध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुर्नरचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरूवात केली, मराठी मंगलाष्टके रचली.

**सामाजिक कार्य :**

मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक राइटस् ऑफमॅन त्यांच्या वाचनात आले. त्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळे विषमता दूर करण्यासाठी स्त्री शिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींचे शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे. असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. निती हाच मानवी जीवनाचा आधार आहे. हा विचार मांडणारे ज्योतीराव एक तत्वचिंतक व्यक्तिमत्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड इ.ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांचा आधारावरून विश्वकुटूंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचे वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे, त्यातील काही महत्वाची वचने.

*स्त्री अथवा पुरूष एकंदर सर्व गावाचे, प्रांताचे, देशाचे, खंडाचे संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधात, स्त्री आणि पुरूष या उभयतांनी अथवा सर्व स्त्रियांनी अथवा एकमेकात अकमेकांनी कोणत्याही प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटूंब समजून एकमताने सत्यवर्तन करून रहावे.

* आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतःच स्वतंत्र्य प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपआपसात साज्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.

* महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा जो बोध केला त्यातील ही काही वचने आपण वाचली की लक्षात येते, ज्योतीरावाचा आवाका किती मोठा होता. त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाज्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. त्यासाठी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात आमुलाग्र बदल घडवून आणायचा होता. त्यासाठी मानवी स्वभाव आणि मानसिकता यात काय बदल केले पाहिजे याबाबतही ज्योतीरावांनी विपुल लेखन केले आहे. अखंड या काव्यप्रकारात त्यांनी मानवाचा धर्म, आत्मपरिक्षण, निती, समाधान, सहिष्णूता, सदसदविवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता, इत्यादी गोष्टींवरही भाष्य केले आहे. ज्योतीरावांनी वेगवेगळ्या अखंडातून जे विचार मांडले, मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केा, त्यातील काही निवडक भाग येथे विचारात घेतला पाहिजे. ज्योतीराव आपल्या अखंडात म्हणतात,

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी || त्याचे भय मनी || धरा सर्व ||१||
न्यायाने वस्तूंचा उपयोग घ्यावा || आनंद करावा || भांडू नये ||२||
धर्म राज्य भेद मानवा नसावे || सत्याने वर्तावे || ईशासाटी ||३||
सर्व सुखी व्हावे भिक्षा जी मागतो || आर्यास सांगतो || जोती म्हणे ||४||

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले.. ही उक्ती सार्थ करणारे महात्मा फुले हे भारतीय इतिहासातले आद्य समाज क्रांतिकार आपले विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे ते बंडखोर युगपुरूष होते. आपली वैचारिक मांडणी व कृतीतून त्यांनी अनेक आघाड्यांवर लढा दिला. जाती प्रथा, ब्राम्हणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण, शेतकरी - कष्टकरी यांची पिळवणूक, सांस्कृतिक गुलामगिरी या सर्व आघाड्यांवर संघर्ष केला. त्यांचा हा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता.

ज्योतीरावांनी सर्वांना शिक्षण, स्त्री- पुरूष समता, जातीनिर्मुलन, संसाधनांचे फेरवाटप, ज्ञाननिर्मिती, धर्मचिकित्सा आणि

आंतरजातीय विवाह या कार्यक्रम पत्रिकेच्या आधारे आधुनिक भारताच्या पायाभरणीचे काम केले. ख्यातनाम विचारवंत डॉ.रामचंद्र गुहा यांनी ज्योतीरावांना आधुनिक भारताचे शिल्पकार मानलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांना गुरूस्थानी मानायचे आणि फुल्यांचा वारसा आपण कायम उराशी बाळगू असे अभिमानाने सांगायचे. १९३२ साली पुण्यात बोलताना महात्मा गांधी म्हणाले होते, ज्योतीराव फुले देशके पहले महात्मा थे, असली महात्मा थे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी फुल्यांना समाज क्रांतिकारक म्हणून गौरविले होते. तीन अगदी भिन्न वैचारिक नेत्यांनी फुल्यांचा गौरव केलेला आहे. डॉ.जी.एस.घुर्ये आणि एम.एन. श्रीनिवासन यांच्या अनेक वर्षे आधी महात्मा ज्योतीराव फुले यांनी भारतीय समाजाचे विशेषत: जातीव्यवस्थेचे ज्या पध्दतीने शास्त्रीय विश्लेषण केले होते ते पाहता, ज्योतीराव हेच आद्य भारतीय समाजशास्त्रज्ञ ठरतात. त्यांचे हे लेखन आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे.

महात्मा फुले हे पर्यायी संस्कृतीचे जनक होते. बहुजन समाजाच्या मानसिकतेचं समग्र परिवर्तन करण्यासाठी त्यांनी विचार मांडले, चळवळी चालवल्या. बहुतांश भारतीय समाज हा देव, धर्म, यावर अपार श्रध्दा असलेला आहे. अशा समाजाला विज्ञाननिष्ठा, साधनशुचिता आणि विवेकाच्या आधारावर उभी केलेली बुध्दिनिष्ठा श्रध्दा देण्याची त्यांची धडपड होती. ३३ कोटी देवांवर विसंबून असलेल्या समाजाला परंपरा आणि परिवर्तन यांचा सुवर्णमध्य साधून एका नवा विचार त्यांनी दिला. त्यांनी पारंपारिक देव, धर्म संकल्पना नाकारून, निर्मिका ची संकल्पना विकसित केली. सत्यशोधकाला ३३ नियमांची आचारसंहिता घालून देताना ही निर्मिक संकल्पना त्यांनी पायाभूत मानली आहे. लिंगभाव, वर्ग आणि जातीची विषमता संपूर्णपणे नाकारणारी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायावर आधारित ही संकल्पना ते देऊन जातात. अज्ञानाशी ज्ञान, पांगळ्या अन्नदान, हेच बा स्मरण निर्मिकाचे || ही आपली निर्मिकपूजेची, आराधनेची संकल्पना ते सांगतात. बुध्द कबीर येशू, महंमद पैगंबर, संत तुकाराम, थॉ पेन, मिशनरी वृत्ती आणि अमेरिकन उदारमतवाद यांच्या प्रभावातून त्यांची ही संकल्पना विकसित होताना दिसते. सत्यधर्माची, शोषणविरहित आणि सर्व चिकित्सक मानसिकता वाढीला पुरक ठरणारी ही मांडणी काळाच्या ओघात ओढताना झाल्यानं बाजूला पडली असली तरी भारतीय समाजमनाला ती एक उत्तम पर्याय देते, या बाबत दुमत असण्याचे कारण नाही.

संदर्भ -

* ज्योतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार, लोकवाङमयगृह, मुंबई ओमवेट गेल (१९९०)

* महात्मा फुले समग्र वाङमय, साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई कीर मालशे (संपा)१९८०

* सत्यशोधकी साहित्याचा इतिहास - खंड पहिला, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, गुंदेकर श्रीराम (२०१०)

* महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्ग जातिप्रभुत्व, सुगावा, पुणे बगाडे उमेश (२००६)

* महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार ग्रंथाली, मुंबई, सरदार गं.बा.(२००५)

❑❑❑

19-27

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

Shri. Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed 431131(MH)

February 2020 Special Issue-23 Vol.2

## [illegible]nguage and Literature in [illegible]

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

**32.** वैश्विक पातळीवरील स्त्रीवादी साहित्यच्या जाणीवा 78
प्रा.नाथराव ज्ञानोबा गरजाळे

**33.** पालि भाषा व पालि साहित्याचा आधुनिक काळातील प्रचार-प्रसार 81
डॉ. के.व्ही. जावळे, जयश्री श्रीधर कांबळे

**34.** जागतिकीकरण आणि मराठी साहित्य 83
प्रा. डॉ. रामहारी मायकर

**35.** भाषांतर आणि मराठी साहित्य 85
प्रा. चुणचुणे एन. एच.

**36.** मराठी स्त्री नियतकालिकांचे योगदान 89
**संगीता रामजी भगत**

**37.** जागतिकीकरणाचा साहित्यावर झालेला परिणाम 94
डॉ. अलका प्रदीप वालचाळे (सरोदे)

**38.** भाषा आणि दुरचित्रवाणी माध्यम 96
डॉ. सुनिल माधवराव जाधव

**39.** संवाद - माध्यमे : सामाजिक परिवर्तनाचे साधन. 98
नंदकुमार धोंडिराम कांबळे

**40.** भाषा आणि साहित्य (वर्तमानपत्र) 100
कपिल बाबुराव लामतूरे

**41.** सिनेमा, साहित्य आणि भाषा 102
विकास लिंबाजी कदम

**42.** महिला आणि सामाजिक समस्या 104
सुरेश भिमराव लेकुळे

**43.** 'जागतिकीकरणाचा ग्रामीण साहित्यावरील परिणाम' 106
डॉ. लहूकुमार हरिदास खंडाळे

**44.** जागतिक पातळीवरील मराठी कवितेचे चित्रण 109
प्रा डॉ खाडप संजय

**45.** जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव 110
प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ

**46.** जातककथेतील बाल साहित्याचा अभ्यास 113
प्रा. डॉ. सारिका विष्णु केदार

**47.** मराठी वृत्तपत्र माध्यमातील बातमीच्या भाषेचा अभ्यास 117
डॉ. रामानंद बापूराव व्यवहारे

**48.** साहित्याची भाषा 123

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 23 Vol. 2
February 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN - 2319 - 8648
Impact Factor - 7.139

# जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव

**प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ**
स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड

**प्रस्तावना :**

१९९० नंतर जागतिकीकरण या विषयावर अनेक क्षेत्रात चर्चा सुरू झाली. या विषयावर इतकी चर्चा आणि बोलणे झाले की मनामध्ये संभ्रम व्हावा. जागतिकीकरण नेमके चांगले आहे की वाईट असे प्रश्न पडावेत असे वातावरण निर्माण होत गेले. जागतिकीकरण हा परावलीचा शब्द झाला आहे. वसुधैवं कुटूंबकम् हे भारतीय संस्कृतीचे वेदकाळापासूनचे स्वप्न साकार करणारे की पाश्चात्य संस्कृतीच्या भोगवादी स्वार्थी प्रवृत्तीमुळे संहाराकडे नेणारे जागतिकीकरण नेमके कसे असेल, असा सूर निघत जातो. यामध्ये मराठी भाषा, संस्कृती नष्ट तर होणार नाही ना ? अशी अनाठायी भिती देखील व्यक्त करण्यात येते. जागतिकीकरणामुळे मराठी मराठी, भाषा, साहित्य या सर्वावर काय परिणाम झाले याबाबत अध्ययन होणे गरजेचे आहे.

आपल्या देशाने जागतिकीकरणाचा स्विकार करून आता दोन दशकापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला आहे. त्याचे परिणामही अगदी शहरापासून ते छोट्या खेड्यापर्यंत पसरलेले दिसतात. जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम, जागतिकीकरणात मराठी भाषेचे अस्तित्व कसे असेल, जागतिकीकरणात मराठी साहित्य निर्मिती वाटचाल कशी करेल ? अशा विविध पातळीवर जागतिकीकरण आणि साहित्य या मुद्याचा विचार करावा लागतो. जागतिकीकरणाचे साहित्यावर काय परिणाम झाले, होताहेत यांची वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा सुरू झाली. जागतिकीकरणाचा साहित्यावर कसा परिणाम होतो, त्याचे स्वरूप कसे असते या प्रश्नांची ही उत्तरे शोधली पाहिजेत. ज्ञानेश्वराच्या साहित्यापासून ते कालपर्यंतचे साहित्य लिहिणाऱ्या प्रस्थापित आणि नव साहित्यिकांनी जागतिकीकरणाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. कवितेत, कथेत, कादंबरीत अनेक वेळा जागतिकीकरणामुळे माणसाच्या आयुष्याची झालेली फरफट दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे. जागतिकीकरणामुळे सामाजिक, राजकीय, साहित्य क्षेत्रासह सर्वच पर्यावरण प्रभावित झाले आहे. जागतिकीकरणाने आपल्या समग्र सांस्कृतिक आकृतीबंधाला नवा आकार दिल्यामुळे एका नव्या संस्कृतीचा जन्म झाला. ही संस्कृती तंत्रज्ञानाने व्यापलेली असल्यामुळे आपले सांस्कृतिक वैभव, वैविध्य, भाषा या घटकावर परिणाम झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. साहित्याच्या क्षेत्रात तर विविधांगी अशा स्वरूपाची चर्चा घडून आली.

जागतिकीकरण म्हणजे काय ?

जागतिकीकरण म्हणजे नेमके काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना राष्ट्र ही संकल्पना उदयास येण्याच्या अगोदरच काळ विचारात घ्यावा लागतो. माणुस अप्रगत अवस्थेत जगायचा अन्न ही गरज शिकार करून भागवायचा. नंतर मानवाच्य प्रगतीला सुरूवात झाली तो छोटे छोटे समूह तयार करून पाण्याच्या साठ्याजवळ वस्ती करून राहु लागला.

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा बरोबर संस्कृतीचा विकास होत असताना समाजाच्या गरजा मोठ्या प्रमाणाव वाढल्या प्रत्येकाच्या गरजा अनंत आणि आपल्या पातळीवर त्याची पूर्तता होण्यासाठी कौशल्य कमी पडु लागले यातुनच वर देवाण-घेवाण पध्दत अस्तित्वात आली. यामुळे सगळ्यांनाच चांगल्या वस्तु, सेवा मिळू लागल्या. मी इतरांच्या गरजा पु करण्यासाठी माझ्या ठिकाणी असणारे कौशल्य वापरायचे व माझ्या गरजा पुर्ण करण्यासाठी इतरांनी त्यांचे कौशल्य वापराव यामध्ये परपस्परांचे हीत सामावलेले होते. हीच संकल्पना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली की तेच जागतिक व्यापाराचे मुल तत्व बनते.

२० व्या शतकाच्या शब्द कोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे, एकाच वेळी संपूर्ण जगाचा वि जगातील सर्व लोकांचा विचार करणे. डॉ.यशवंत मनोहर यांच्या मते जागतिकीकरण म्हणजे जगातील वेगवेगळ्या देश परस्पर व्यापार करणे होय. भारतात १९९० च्या आसपास जागतिकीकरणाला सुरूवात झाली.

च्जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, व्याप सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.छ ही बायलिस स्मिथ यांची व्य जागतिकीकरणाचे स्वरूप समजून घेण्यासाठी महत्वाची आहे. जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगाची एका बाजार रूपांतरित होण्याची प्रक्रिया होय. जे घ्स्थानिकङ आहे ते घ्जागतिकङ आहे आणि जे घ्जागतिकङ ते घ्स्थानिकङ आ प्रक्रियेने संपूर्ण जग हे खेडे बनून राहिले आहे. विशिष्टतेचे सार्वजीकीकरण आणि सार्वत्रिकतेचे विशिष्टीकरण या र रॉबर्टसन प्रक्रियेला ओळखतो. जागतिकीकरणाचा सामाजिक आणि कौटुंबिक, सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दि जागतिकीकरणाचा स्पष्ट अविष्कार बाजारपेठा, व्यापार,वस्तु आणि आर्थिक गुंतवणूक या क्षेत्रामधील वित्त प्रक्रियामध्ये येतो. आर्थिक धोरणे, कृषी, रोजगार, नैसर्गिक आणि मानवी संसाधने यावरही जागतिकीकरणाने आपला प्रभाव उम आहे. जागतिकीकरणामुळे घराष्ट्रातीत नागरिकत्वङ निर्माण होत आहे. बहु सांस्कृतिक नागरिकत्वङ उदयाला येत आ काळाच्या ओघात जागतिक नागरिकत्व ही संकल्पना प्रत्यक्षात येण्याची गती वाढते आहे.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 23 Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

**जागतिकीकरण आणि साहित्य-**

साहित्याला समाजजीवनाचा आरसा म्हटले जाते. जे समाजात प्रचलित असते त्याचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते. त्याचबरोबर जे साहित्यामध्ये मांडलेले असते त्याचा समाज जीवनावर प्रभाव पडत असतो. साहित्य आणि समाज यांचा अन्योन्यसंबंध असतो दोन्ही घटक परस्पर पूरक आहेत. समाजजीवनातील घडामोडीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात साहित्यावर

झालेला असतो. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध शोधण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात झालेला आहे.

जागतिकीकरणानंतर मराठी साहित्यातील विविध प्रकारावर आणि प्रवाहावर परिणाम झालेले आहेत. मराठी भाषिक समाजात झालेल्या बदलांचा परिणाम मराठी साहित्यामध्ये दिसून येतो. ग्रामीण जीवन, परंपरा, सणवार, वेशभूषा, या घटकांवर पडणाऱ्या पडसादांची दखल साहित्यात घेतली गेली. जागतिकीकरणाच्या प्रवाहात खंबीरपणे उभे राहून साहित्य समृध्द करावेच लागेल. साहित्य विषयक भूमिका मांडताना आशय आणि अनुभवाचे क्षेत्र विस्तारत, मानवतावादी मूल्यांना समावलेले साहित्य निर्माण करण्याची मानसिकता ठेऊन साहित्यिक लिहु लागले. उपभोगवादी, चंगळवादी साहित्य लिहून सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी देखील साहित्य लेखन केले जाऊ लागले. अनुभव विश्व बदलण्यासाठी साहित्याच्या विकासाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची आणि स्थित्यंतराला आपल्या लेखणीतून मांडणारी नवी पिढी जागतिकीकरणामध्ये लिहु लागली. श्रेष्ठ कलाकृतीतून व्यक्त होणारी अभिव्यक्ती ही उत्कंठावर्धक साहित्याला जशी गती देण्याचे काम करते तशी भाषेला नवीन वाचक वर्ग जोडण्याची कामही करते. मराठी जीवनाच्या विविध परिघांना स्पर्श करण्यासाठी मराठी लेखकांचे अनुभव विश्व समृध्द झाले पाहिजे. जागतिकीकरणानंतर साहित्याचे विषय बदलल्याचे दिसते. तीव्र संघर्ष आणि जगण्याची विलक्षण गती यामुळे जीवनातील फरफट वाढत आहे. शतकाच्या पलीकडे जाऊन डोकावण्याचे सामर्थ्य ज्या साहित्यामध्ये आहे, ज्या लेखकामध्ये आहे तोच साहित्यिक आणि तेच साहित्य टिकून राहणार हे शाश्वत सत्य आहे. लेखन करताना नव्या दिशेने विचार करून लेखन केले पाहिजे.

जागतिकीकरण हे आजच्या जीवनशैलीचे अभिन्न असे वास्तव झालेले आहे. ग्रामीण व्यवस्थेपासून महानगरीय संस्कृतीपर्यंत जागतिकीकरणाचा विळखा मानवी जीवनाला घट्टपणे बसलेला आहे. घ्खाजगीकरणङ, घ्उदारीकरणङ आणि घ्जागतिकीकरणङ या संज्ञांनी जगाच्या पाठीवरचा प्रत्येक माणूस बध्द झाला आहे. घ्साहित्यङ देखील त्याला अपवाद राहु शकत नाही. साहित्याची नवी गरज भागवणारा नव्या युगाचा नवा साहित्यिक जागतिकीकरणानंतर निर्माण होतो आहे, उत्तम लिहितो आहे, वैश्विक मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेऊन वाटचाल करतो आहे.

**जागतिकीरणाचा मराठी साहित्यावर झालेला परिणाम**

नव्वदोत्तरी साहित्य म्हणून ज्या साहित्याचा उल्लेख केला जातो त्या साहित्यावर जागतिकीरणाचा थेट परिणाम झाल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या रेट्यात साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये काहीसी धूसर झाल्यासारखी वाटतात. सामान्य माणसाची जीवनशैली बदलली. त्याच्या वैचारिक निष्ठा प्रभावी आणि प्रखर राहिल्या नाहीत. व्यक्तिगत सुखाला महत्व आले. त्याच्या निष्ठा आणि विचारधारांना धक्के पोहोंचले. समाज आणि जीवनातील बदल, ढासळलेली कुटूंब व्यवस्था, सातंत्र्याचा गैरवापर, लैंगिकतेचे उग्र प्रश्न हेच आजचे वास्तव विद्यमान लेखक चित्रित करत आहेत. माणसाकडे केवळ उपभोक्ता म्हणून पाहिजे जात आहे ही खंत देखील लेखक व्यक्त करत आहेत. वैयक्तिक म्हणुन दुर्लक्षित झालेल्या अनेक समस्या २५ वर्षात सामाजिक समस्या म्हणून आक्राळ-विक्राळ रूप धारण करत आहेत. स्वभाविकच त्याची प्रतिक्रिया साहित्यातुन उमटताना दिसत आहे. काळ आणि साहित्यनिर्मिती यांच्यात अनेकविध प्रकारचे संबंध असतात. जाणिवा, विचार मूल्यकल्पना, संवेदना, अभिरूची या रूप तत्वामुळे साहित्यात गुणात्मक बदल घडत असतात. प्रभावप्रेरणा प्रवृत्तीतुनही साहित्य अविष्काराचे समान बंध निर्माण होत असतात. याची प्रचिती जागतिकीकरणानंतरचे साहित्य अनुभवताना येते. काळ, युगप्रेरणा सामाजिक-सांस्कृतिक प्रभाव-प्रवृत्ती विचारधारा यांच्या ठळकपणातुन साहित्य प्रभावित होतच असते. जागतिकीकरणामुळे नव्वदोत्तर कालखंडात एक नव संस्कृती उदयास आली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाज जीवन ढवळून निघाले आणि त्याचा परिणाम माणसाच्या जगण्यावर झाला व याचे चित्रण साहित्यामध्ये ओघाणे आलेच. या काळात माणसाचे ग्राहकामध्ये रूपांतर केले गेले. ज्यांना हवे होते त्यांनी आपल्या पध्दतीने जागतिकीकरणाचा लाभ घ्यायला सुरूवात केली. दुर्बलावर हे जागतिकीकरण लादलेले आहे तो मात्र या प्रवाहात फरफटत, वाहवत चालला आहे. ज्या बदलासाठी कदाचित शतकभर थांबावे लागले असते असे बदल जागतिकीकरणात पाहिल्या दहा-पंधरा वर्षातच कमालीच्या वेगाने झालेले दिसून येतात. जीवनात पैशाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. संगणक क्रांती, स्मार्ट फोन, सोशल मिडीया, जाहिराती, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, मॉडेलिंग, असे अनेक बदल या दोन-आडीच दशकातील आहेत. या बदलामध्येच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, उद्योजकांची वाढणारी अमाप संपत्ती याचे रहस्य दडलेले आहे. या अनाकलनीय बदलांचा प्रचंड असा दाब, या दाबामुळे भारतीय जीवनपध्दतीमध्ये झालेले बदल याचे पडसाद साहित्यातून दिसणे अपरिहार्यच आहे.

काळाच्या जीवनवास्तवाचा वेध घेणारे साहित्य हेच खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाच्या परिणामातून निर्माण झालेले साहित्य आहे. या काळातील लेखकांचे दृष्टीकोन एकसारखे नसल्यामुळे सर्वच प्रकारच्या साहित्यामध्ये आशय, अभिव्यक्ती,

रूपबंध आणि भाषा या दृष्टीने विचार केला तर स्पष्ट वेगळेपण दिसून येते. मराठी अभ्यास परिषद, अंतरभारती संस्था, केल्याने भाषांतर यांच्याद्वारे इतर भाषामधील साहित्य मराठीमध्ये आणले जात आहे. ग्रंथ संपादन, चर्चासत्र इत्यादी उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवून साहित्याचा विकास करण्यासाठी जागतिकीकरणानंतर त्यांनी विविध प्रयत्नातून साहित्य विकासाची गती वाढवली.

**निष्कर्ष -**

१. जागतिकीकरणाचे पडसाद शहरी, ग्रामीण जीवनातील व संस्कृतीतील प्रत्येक घटकावर पडले आहेत.
२. जागकिीकरणाच्या प्रभावामुळे मराठी भाषा आणि मराठी ग्रामीण बोली भाषा यांच्या रूपावर परिणाम जाणवला आहे.
३. जागतिकीकरणामुळे मराठीतील साचलेपण दूर करून अन्य भाषामधील अभिज साहित्याचे भाषांतर करून उत्तम व श्रेष्ठ मराठीमध्ये आणण्यासाठी चालना मिळाली.
४. कृषी क्षेत्रातील महत्वाचा घटक शेतकरी हा जागतिकीकरणाच्या बाजारपेठेत भरडला जातोय याचे मोठ्या प्रमाणात चित्रण साहित्यात आले नाही.
५. ग्रामीण साहित्यामध्ये जागतिकीकरणाचा प्रभाव दिसुन येतो. मात्र यामध्ये सुखात्मिका निर्माण होण्याऐवजी शोकात्म साहित्य जास्त निर्माण झाले आहे.
६. जागतिकीकरणाने भौतिक सुखसोयी वाढल्या. तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला पण साहित्य आणि संस्कृती, कला आणि भाषा या सारख्या घटकावर प्रतिकूल परिणाम झाला.
७. माणसाचे माणुसरूप नष्ट होऊन त्याच्या वस्तूरूपाला महत्व आल्याची जाणीव जागतिकीकरणानंतरचे साहित्य करून देते.
५. नेमाडे भालचंद्र (लेख-साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण)
६. कुलकर्णी नितीन-शहरातील नागरिकांनो, नव अनुष्टुभ, मे-जून २०१३
८. उपहारा व उपरोधाच्या अंगाने जाणारे जागतिकीकरणानंतरचे साहित्य वर्तमान व्यवस्थेचे सत्य रूप वाचकांसमोर ठेवते.
९. जागतिकीकरणानंतरचे साहित्य कल्पनेपेक्षा अधिक वास्तवाभिमुख आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. कोत्तापल्ले नागनाथ - साहित्याचा अवकाश-प्रतिमा प्रकाशन,पुणे,२००३
२. कऱ्हाडे सदा-समाज आणि साहित्य लोकवाङमय गृह, प्रकाशन,मुंबई १९९५
३. जाधव रा.ग.-साहित्य व सामाजिक संदर्भ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,१९९६
4. हातकणंगलेकर म.द.-मराठी कथा रूप आणि परिसर श्रीविद्या प्रकाशन,पुणे,2008

Shri. Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed 431131(MH)